पेजिनेशनसाठी अनुभवी व्यक्ती पाहिजे
GRAPHIC DESIGNER
Send Resume on Whatsapp
Contact : 7720046005

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25

विश्वास पिढ्यान् पिढ्यांचा
काळे ज्वेलर्स
सोने चांदी हिरे नवरत्न
9601222777
9615222777
बस स्टँड कॉम्प्लेक्स, संगमनेर

अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १५४। किंमत - २ रू संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) शुक्रवार। २६/०६/२०२६ । पाने - ६

लग्नाचा बस्ता.. राजेन्द्रमध्ये बांधा!
मेन रोड, संगमनेर. फोन : 02425-225740, 7901031155
१९५९ पासून
विश्वासाची सार्थ परंपरा...
राजेन्द्र

# आला पावसाळा, आरोग्य सांभाळा

## भेसळीच्या विषमय अन्नापासून नागरिकांनी सावध राहावे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पावसाळ्याच्या आगमनाबरोबरच विविध साथीचे आजार, अन्नजन्य विषबाधा आणि आरोग्याच्या समस्या वाढण्याचा धोका निर्माण होतो. अशा परिस्थितीत नागरिकांनी आपल्या आरोग्याची विशेष काळजी घेण्याबरोबरच भेसळयुक्त व विषयुक्त अन्नपदार्थांपासून सावध राहण्याचे आवाहन आरोग्य विभाग आणि अन्न व औषध प्रशासनाने केले आहे.



पावसाळ्यात वातावरणातील आर्द्रता वाढल्याने अन्नपदार्थ लवकर खराब होतात. अनेक ठिकाणी नफा कमावण्याच्या उद्देशाने निकृष्ट दर्जाचे खाद्यतेल, कृत्रिम रंग, रसायनयुक्त मिठाई, मसाले, दूध व दुग्धजन्य पदार्थांची विक्री केली जाते. अशा भेसळयुक्त अन्नाचे सेवन केल्यास अन्न विषबाधा, अतिसार, उलट्या, पोटदुखी, कावीळ आणि इतर गंभीर आजार होण्याची शक्यता असते.

नागरिकांनी रस्त्यावरील उघड्यावर विकल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांचे सेवन टाळावे. खरेदी करताना अन्नपदार्थांची उत्पादन व मुदत समाप्ती तारीख तपासावी. पिण्यासाठी नेहमी स्वच्छ व उकळलेले पाणी वापरावे. फळे व भाज्या स्वच्छ धुवूनच वापराव्यात. तसेच संशयास्पद अन्नपदार्थ आढळल्यास तात्काळ संबंधित प्रशासनाकडे तक्रार नोंदवावी.

सुरक्षित अन्न, निरोगी जीवन हा संदेश लक्षात ठेवून प्रत्येक नागरिकाने जागरूक राहणे आवश्यक आहे. पावसाळ्यातील थोडीशी खबरदारी अनेक आजारांपासून संरक्षण देऊ शकते. त्यामुळे आला पावसाळा, आरोग्य सांभाळा हा संदेश प्रत्येक घरापर्यंत पोहोचविण्याची गरज निर्माण झाली आहे.

दरम्यान अन्न व औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे यांची नियुक्ती झाल्यापासून त्यांनी नागरीकांच्या आरोग्याला प्राधान्य देत भेसळखोरांवर कारवाईचा बडगा उगारला आहे. भेसळयुक्त दुध , पनीर, खवा, अन्न पदार्थ, रस्त्यावर उघडे पदार्थ, अवैध गुटखा विक्री यावर कारवाई सुरू केल्याने भेसळखोरांचे धाबे दणाणले आहे. अन्नातील भेसळ रोखणे ही केवळ शासन प्रशासनाचीच जबाबदारी नाही तर नागरीकांनी देखील तितकेच सतर्क राहीले पाहिजे. या भेसळखोरांना रोखण्यासाठी तुकाराम मुंढे सारख्या अधिकाऱ्यांचे हात बळकट केले पाहिजे. यासाठी सजग नागरीकांनी भेसळखोरांना ओळखून आरोग्य विभागास माहिती द्यावी.

### भेसळयुक्त अन्नपदार्थ आरोग्यासाठी धोकादायक

**बाजारात भेसळयुक्त पदार्थांमुळे व्यापाऱ्यांना आर्थिक फायदा होत असला तरी नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. भेसळयुक्त दूध, मिठाई, मसाले, तेल, खाद्यपदार्थ व पेये यांमुळे अन्नविषबाधा, पचनसंस्थेचे विकार, यकृत व मूत्रपिंडांचे आजार तसेच दीर्घकालीन आरोग्य समस्या उद्भवू शकतात. अन्न खरेदी करताना नागरिकांनी दर्जा, पॅकिंग, उत्पादन व कालबाह्यता तारीख तपासावी. संशयास्पद किंवा निकृष्ट दर्जाचे अन्नपदार्थ आढळल्यास संबंधित अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.**

# जीएसटी परिषदेत महाराष्ट्राची ठोस भूमिका हवी - आ. सत्यजीत तांबे

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२६ (विधेयक क्रमांक ३३) वरील चर्चेत सहभागी होताना आमदार सत्यजीत तांबे यांनी जीएसटी संदर्भातील राज्याच्या भूमिकेबाबत महत्त्वपूर्ण सूचना सभागृहात मांडल्या.



आमदार तांबे म्हणाले की, सभागृहात जेव्हा जेव्हा जीएसटीचा विषय उपस्थित होतो, तेव्हा हा केंद्र सरकारचा विषय असल्याचे सांगितले जाते. मात्र जीएसटी परिषदेच्या बैठकीत राज्य सरकारचे प्रतिनिधित्व अर्थमंत्री किंवा त्यांचे प्रतिनिधी करत असतात. त्यामुळे महाराष्ट्रातील विविध घटकांच्या अडचणी आणि सूचना जीएसटी परिषदेत प्रभावीपणे मांडल्या जाणे आवश्यक आहे. ते म्हणाले की, जीएसटी परिषदेतील चर्चेत अनेकदा राज्याचा प्रलंबित हिस्सा आणि तो लवकर मिळविण्याचा विषय केंद्रस्थानी असतो. मात्र राज्यातील करदाते, स्थानिक स्वराज्य संस्था, शैक्षणिक संस्था आणि धर्मादाय संस्थांना भेडसावणाऱ्या प्रत्यक्ष अडचणीही परिषदेसमोर मांडल्या जाण्याची गरज आहे.

आमदार तांबे यांनी विशेषतः स्थानिक स्वराज्य संस्थांचा मुद्दा उपस्थित केला. ग्रामपंचायत, नगरपालिका आणि महापालिका यांना अनेक बाबतीत जीएसटी आकारता येत नाही, मात्र त्या स्वतः खरेदी करत असलेल्या वस्तू आणि सेवांवर जीएसटी भरावा लागतो.

त्यामुळे त्यांच्या विकासकामांचा खर्च वाढत असल्याचे त्यांनी नमूद केले. याचप्रमाणे शैक्षणिक संस्था आणि धर्मादाय संस्थांनाही त्यांच्या सेवांवर जीएसटी आकारता येत नसला तरी बांधकामासह विविध खर्चांवर जीएसटी भरावा लागत असल्याने त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडत असल्याकडे त्यांनी लक्ष वेधले. जीएसटी प्रणालीतील सुधारणा सातत्याने होत असल्याचे नमूद करताना आमदार तांबे म्हणाले की, जीएसटी (पान ४)

# स्वस्त धान्य दुकानदारांच्या प्रश्नांवर तातडीने निर्णय घ्या - आ. खताळ

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यासह महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानदारांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या अंमलबजावणी दरम्यान विविध प्रशासकीयव तसेच आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत असून या समस्यांमुळे वितरण व्यवस्थेवर मोठा परिणाम होत आहे. या सर्व प्रश्नांवर तातडीने कार्यवाही करून दुकानदारांना न्याय द्यावा, अशी मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात उपस्थितीत केली.




शहरातील स्वस्त धान्य दुकानदारांना धान्य वितरणावेळी वाहनाची टी.पी. (ट्रान्सपोर्ट परमिट) व परमिटची प्रत दिली जात नाही. त्यामुळे धान्य प्राप्तीचा अधिकृत पुरावा दुकानदारांकडे उपलब्ध राहत नाही. शासनाने ही कागदपत्रे नियमितपणे उपलब्ध करून द्यावीत. तसेच थेट धान्य वितरण योजनेअंतर्गत रिकामे बारदान वजा करून पूर्ण वजनाचे धान्य प्रत्यक्ष वजन करून देण्यात यावे. तसेच कोविडच्या काळात अनेक दुकानदारांनी चलनाद्वारे रक्कम भरून घेतलेल्या धान्याचे शासनाच्या आदेशानुसार मोफत वितरण केले होते. मात्र त्याची परतफेड अद्याप झालेली नसल्याची बाब त्यांनी सभागृहात मांडली.

संबंधित दुकानदारांना थकीत रकमेचा परतावा तातडीने देण्यात यावा, कोविड काळात वितरित करण्यात आलेल्या धान्यावरील मार्जिन 'कॅरी फॉरवर्ड' या कारणास्तव अनेक दुकानदारांना मिळालेले नाही. त्यामुळे प्रलंबित मार्जिनची रक्कम तात्काळ अदा करण्यात यावी गोदामातून मिळणाऱ्या धान्याच्या गोण्या अनेकदा फाटलेल्या अवस्थेमध्ये असतात तसेच काही गोण्यांमध्ये वजन कमी असल्याचे आढळून येते. परिणामी दुकानदारांना धान्य तुटीचा फटका बसतो. (पान ४ वर)

# आमचा एकही आमदार फुटणार नाही - पवार

युवावार्ता (प्रतिनिधी)

लोणी - शिवसेना ठाकरे गटातील तब्बल ६ खासदारांनी मोठी बंडखोरी केली. ६ खासदार थेट शिवसेना शिंदे गटात गेले. त्यांचा पक्षप्रवेशही झाला. ६ खासदारांनी लोकसभा अध्यक्षांना स्वतंत्र गटासाठी पत्रही दिले. खासदारांनंतर आता शिवसेना ठाकरे गटातील काही आमदारही शिवसेना शिंदे गटात प्रवेश करणार असल्याची जोरदार चर्चा ही रंगताना दिसतंय. यावर शिवसेनेसह इतरही पक्ष अलर्ट मोडवर आहेत. आमदारांची बैठकही ठाकरे गटाकडून घेतली जाणार आहे. यादरम्यानच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटही अलर्ट मोडवर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचेही काही आमदार आणि



खासदार बंडखोरीच्या तयारीत असल्याची जोरदार चर्चा रंगताना दिसली. यावर आता स्पष्ट बोलताना शरद पवार दिसले. राष्ट्रवादीच्या आमदारांच्या बंडखोरीच्या चर्चांवर त्यांनी पहिल्यांदाच भाष्य केले.

शरद पवार यांनी म्हटले की, आमचा एकसुद्धा आमदार कुठे जाणार नाही. शरद पवार यांना विचारण्यात आले की, ठाकरेंच्या खासदारांनंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार खासदार फुटणार असल्याची चर्चा आहे? यावर शरद पवार यांनी स्पष्ट बोलताना म्हटले की, आमचा एकसुद्धा आमदार कुठे जाणार नाही. शरद पवार यांच्यासोबत गाडीत युगेंद्र पवारही होते.

शिवसेना ठाकरे गटातील खासदारांनी केलेल्या बंडखोरीनंतर राष्ट्रवादी काँग्रेस अलर्ट मोडवर आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातील आमदार, खासदार बंडखोरी करणार असल्याची चर्चा होती. त्यावर शरद पवार यांनी थेट भाष्य केले. राज्यातील राजकारणात मोठ्या घडामोडी घडताना दिसू शकतात. पक्षफुटीच्या मुद्द्यात सर्वच पक्ष अलर्ट मोडवर आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेकडून ऑपरेशन टायगर राबवण्यात आले.

# व्हेनेझुएलात भूकंप हजारो मृत्यूमुखी

नवी दिल्ली (वृत्तसंस्था)

व्हेनेझुएलामध्ये दोन शक्तिशाली भूकंपांमुळे हाहाकार माजला आहे. दक्षिण अमेरिकन देश व्हेनेझुएलामध्ये बुधवारी संध्याकाळी ६.३४ वाजता ७.२ आणि ६.३५ वाजता ७.५ तीव्रतेचे दोन धक्के जाणवले. त्यावेळी भारतात गुरुवारी पहाटे ३.३४ आणि ३.३५ वाजले होते.

अमेरिकन जिओलॉजिकल सर्वेनुसार, भूकंपाने १० हजारांहून अधिक लोकांचा मृत्यू होण्याची ४४% शक्यता आहे. तर, एक लाख लोकांचा जीव जाण्याचीही ३०% शक्यता आहे. आतापर्यंत ३२ मृत्यूंची पुष्टी झाली आहे, तर ७०० हून अधिक लोक जखमी झाले आहेत.










Km HOSPITAL
विश्वसनीय उपचारांची परंपरा
अत्याधुनिक वैद्यकीय सेवा
माफक दरात - संगमनेर येथेच
105 बेड्स
तज्ञ डॉक्टर्स
अत्याधुनिक सुविधा
कॅशलेस सुविधा किंवा मेडिक्लेम सुविधा उपलब्ध
हृदय विकार, समर्पित स्त्रीरोग विभाग, अस्थिरोग, अपघात विभाग, मूत्रविकार, सांधे प्रत्यारोपण शस्त्रक्रिया, मेंदू व मणके विकार शस्त्रक्रिया, लॅपरोस्कोपिक सर्जरी, गुदविकार उपचार व शस्त्रक्रिया, जनरल मेडिसिन, छातीचे विकार, पॅरालीसीस मधुमेह विकार, एंडोस्कोपिक स्पाइन सर्जरी, रोबोटिक सर्जरी, गुदविकार विभाग, अत्याधुनिक कॅथ लॅब, मॉड्युलर ऑपरेशन थिएटर- डायलिसिस प्लास्टिक सर्जरी सिटी स्कॅन, सोनोग्राफी विभाग
सर्व वैद्यकीय सेवा एकाच छताखाली 02425 - 226532/33
पत्ता - सदाशंकर नगर, पोफळे मळा, बी.एड. कॉलेज जवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर
एकत्रित आयुष्यमान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना
9953299532
आजच संपर्क करा
24/7 Emergency Services

# भूमी अभिलेखच्या मनमानी कारभाराविरोधात नागरिक आक्रमक , प्रशासनाला निवेदन

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर येथील भूमी अभिलेख कार्यालयातील कामकाजात होत असलेली दिरंगाई, मनमानी कारभार आणि कथित भ्रष्टाचारामुळे त्रस्त झालेल्या नागरिकांनी तहसीलदार तथा तालुका दंडाधिकारी यांच्याकडे निवेदन सादर करून तातडीने कारवाईची मागणी केली आहे. तसेच कार्यालयात पूर्णवेळ उपअधीक्षक उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली असून मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्यास आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

नागरिकांनी दिलेल्या निवेदनात मोजणी प्रकरणांमध्ये होत असलेल्या विलंबाबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मोजणीसाठी तारखा उशिरा देणे, दिलेल्या तारखा वारंवार पुढे ढकलणे आणि संपूर्ण प्रक्रिया अनावश्यकपणे लांबविणे यामुळे शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच मोजणी पूर्ण झाल्यानंतर देण्यात येणारी क प्रत वेळेत मिळत नसल्याने अनेक प्रशासकीय व न्यायालयीन कामे खोळंबत असल्याची तक्रार करण्यात आली आहे. यासाठी निश्चित कालमर्यादा ठरवून नागरिकांना वेळेत सेवा उपलब्ध करून




देण्याची मागणी करण्यात आली आहे.

वारसा हक्क, फेरफार, दुरुस्ती आणि इतर कायदेशीर नोंदींच्या कामांमध्येही अनावश्यक विलंब होत असल्याचे निवेदनात म्हटले आहे. काही प्रकरणांमध्ये अतिरिक्त शुल्काची मागणी होत असल्याच्या तक्रारींची चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

याशिवाय सिटी सर्वे कायद्यानुसार संयुक्त रिव्हिजन मोजणी वेळेत करण्यात यावी तसेच शासकीय जागा, राखीव भूखंड, सुविधा क्षेत्रे, नद्या-नाले आर्दीवरील अतिक्रमणांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. भूमी अभिलेख कार्यालय परिसरात बेकायदेशीर एजंट व दलालांचा वाढता हस्तक्षेप नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. अशा अनधिकृत व्यक्तींवर फौजदारी कारवाई करून पारदर्शक प्रशासन सुनिश्चित करण्याची मागणी करण्यात आली आहे.

नागरिकांच्या या गंभीर तक्रारींची दखल घेऊन प्रशासनाने तातडीने चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी, अन्यथा व्यापक लोकआंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनाद्वारे देण्यात आला आहे. त्यामुळे भूमी अभिलेख कार्यालयाच्या कार्यपद्धतीबाबत पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रशासन यावर काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या निवेदनावर योगेश शिंदे, विशाल वैराळ, शुभम आव्हाड, श्रेयेस भोर, सुमित विघे, ओमकार साळवे, राहुर औचिते, कपिल दारोळे, सिद्धार्थ दारोळे, तुकाराम टोरपे आर्दिच्या सह्या आहेत.

# नवीन आपले सरकार सेवा केंद्रांना मान्यता

अहिल्यानगर (प्रतिनिधी) नागरिकांना विविध शासकीय दाखल्यांसह सर्व सरकारी सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने कंबर कसली आहे. जिल्ह्यातील १ हजार ३८४ ग्रामपंचायतींमध्ये २ हजार ३४५, १२ नगरपालिका व एका छावणी (कॅन्टोन्मेंट) क्षेत्रात ५४ आणि महानगरपालिका क्षेत्रात ३१ अशा एकूण २ हजार ४३० नवीन आपले सरकार सेवा केंद्रांना मान्यता देण्यात आली आहे. या केंद्रांसाठी आणि युझर आयडीसाठी इच्छुकांना २२ २२ जून ते ६ जुलैदरम्यान ऑनलाईन अर्ज करता येणार आहे.

योजनांचे विकेंद्रीकरण आणि 'महाआयडी'चा पुढाकार राज्य सरकारच्या धोरणानुसार यापूर्वी महा-ई-सेवा आणि सेतू केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना विविध दाखले व शासकीय सेवा पुरवल्या जात होत्या. याच धर्तीवर आता ग्रामपंचायतींसह शहरी भागातही शासकीय योजनांचे लाभ थेट पोहोचवले जातील. यासाठी जिल्ह्यात सुमारे अडीच हजार नवीन केंद्रांना मंजुरी मिळाली असून, 'महाआयडी' कडून यासाठी स्वतंत्र युझर आयडी दिला जाणार आहे. सध्या जिल्ह्यातील ५९५ ग्रामपंचायतींमध्ये ही सेवा केंद्रे सुरू असून त्या माध्यमातून नागरिकांना जन्म-मृत्यूच्या दाखल्यांसह ३८ प्रकारच्या सेवा दिल्या जातात. आता नव्या केंद्रांमुळे नागरिकांचे शहर किंवा तालुक्याच्या ठिकाणी होणारे हेलपाटे वाचणार आहेत. यापूर्वी मंजुरी मिळालेल्या जागांवर हरकती मागवण्याची प्रक्रिया पूर्ण झाली असून, आता प्रत्यक्ष केंद्र सुरू करण्याची अंतिम प्रक्रिया राबवली जात आहे. एका व्यक्तीला केवळ एकाच केंद्रासाठी अर्ज कर येणार आहे.

# वॉशर नसलेल्या गॅस सिलेंडरने घेतला पेट

## कापसे कुटुंबाचा संसार जळून खाक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - गॅस सिलेंडरच्या व्हॉल्व्हमध्ये वॉशर नसल्याने झालेल्या गॅस गळतीमुळे लागलेल्या भीषण आगीत मुंजेवाडी (अकलापूर, ता. संगमनेर) येथील कापसे कुटुंबाचा संपूर्ण संसार जळून खाक झाला. या दुर्घटनेमुळे कुटुंबाचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून गॅस एजन्सीच्या निष्काळजीपणामुळे ही घटना घडल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनेश कैलास कापसे हे कामानिमित्त बाहेरगावी असताना त्यांच्या वडिलांनी बोटा येथील एजंटकडून गॅस सिलेंडर आणला होता. घरात सिलेंडर बसविल्यानंतर दिनेश कापसे यांच्या पत्नी अनिता कापसे यांनी शेगडी पेटविण्यासाठी लाईटरचा वापर केला. मात्र, सिलेंडरच्या व्हॉल्व्हमध्ये वॉशर नसल्याने गॅसची गळती होत होती. त्यामुळे रेग्युलेटरजवळ अचानक आग लागून काही क्षणांतच मोठा भडका उडाला. या भीषण आगीत घरातील अन्नधान्य, कपडे, विद्युत उपकरणे तसेच संसारोपयोगी साहित्य पूर्णपणे जळून खाक झाले. आगीची तीव्रता इतकी होती की घरावरील पत्रेही फुटली. घटनेमुळे कुटुंबावर मोठे संकट ओढवले असून लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. दरम्यान, अनिता कापसे यांची १२ वर्षीय मुलगी स्वरा ही घरात झोपलेली होती, तर तिचा तीन वर्षीय भाऊ वेदांगही घरातच होता. सुदैवाने प्रसंगावधान राखत दोन्ही मुलांना सुरक्षित बाहेर काढण्यात आल्याने जीवितहानी टळली. या घटनेनंतर संबंधित गॅस एजन्सीची चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

# व्यावसायिकाची साडेपाच लाखांची ऑनलाईन फसवणूक

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची फ्रँचायजी मिळवून देण्याचे आमिष दाखवत संगमनेर येथील एका मेडिकल व्यावसायिकाची ५ लाख ५० हजार रूपयांची ऑनलाइन फसवणूक केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी येथील सायबर पोलीस ठाण्यात मंगळवारी (२३ जून) गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पावबाकी रोड, संगमनेर परिसरात राहणार्या ४६ वर्षीय व्यक्तीने यासंदर्भात फिर्याद दिली आहे. ते मेडिकल व्यवसाय करतात. त्यांना एका नामांकित डिलिव्हरी लॉजिस्टिक कंपनीची संगमनेर येथे फ्रँचायजी घ्यायची होती.

यासाठी त्यांनी इन्स्टाग्रामवर दिसलेल्या एका जाहिरातीतील फॉर्म भरून माहिती दिली होती. त्यानंतर मयांक गुप्ता नावाचा व्यक्ती (पूर्ण नाव माहिती नाही) तसेच परमार नावाचा व्यक्ती आणि प्रियंका नावाच्या महिलेने फिर्यादीशी मोबाईलव्दारे संपर्क साधला. त्यांनी स्वतःला संबंधित कंपनीचे प्रतिनिधी असल्याचे भासवून विविध शुल्क, नोंदणी प्रक्रिया आणि फ्रँचायजी मंजुरीच्या नावाखाली वेळोवेळी पैसे भरण्यास सांगितले. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून त्यांच्याकडून एकूण ५ लाख ५० हजार रूपये उकळल्याचा आरोप आहे. पैसे भरल्यानंतरही फ्रँचायजी मिळाली नाही.

तसेच संबंधित व्यक्तींशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता प्रतिसाद मिळेनासा झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीच्या लक्षात आले. या प्रकरणात आरोपींनी विविध मोबाईल क्रमांक तसेच ई-मेल आयडींचा वापर केल्याचे समोर आले आहे. सदरचा प्रकार २० मार्च २०२६ ते ६ एप्रिल २०२६ दरम्यान घडला असून फिर्यादीने २३ जून रोजी सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी गुन्हा




दाखल केला असून अधिक तपास पोलीस निरीक्षक सागर ढिकले करीत आहेत.

सोशल मीडिया, इन्स्टाग्राम, फेसबुक किंवा इतर ऑनलाइन माध्यमांवर दिसणार्या फ्रँचायजी, नोकरी, गुंतवणूक अथवा व्यवसायाच्या आकर्षक ऑफरवर विश्वास ठेवण्यापूर्वी संबंधित कंपनीची अधिकृत वेबसाइट, कार्यालय व संपर्क तपशीलांची खातरजमा करावी. कोणत्याही प्रकारचे शुल्क भरताना सावधगिरी बाळगावी, असे आवाहन सायबर पोलिसांनी केले आहे.

# माजी मंत्री थोरात व आमदार तांबे यांच्या पाठपुराव्याने १८४ रूग्णांना दिलासा

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्यातील जनतेच्या कायम सुख दुःखात सहभागी असणारे महाराष्ट्राचे वरिष्ठ नेते मा.महसूलमंत्री लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांनी सर्वसामान्य व गोरगरीब नागरिकांना वैद्यकीय मदतीसाठी मोठा दिलासा देताना तालुक्यातील १८४ रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या अंतर्गत २ कोटी ६ लाख ३५ हजार रुपयांची मदत मिळून देण्यासाठी यशोधन कार्यालयाच्या माध्यमातून सातत्याने पाठपुरावा करून या रुग्णांना मदत केली आहे.

लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या यशोधन जनसंपर्क कार्यालयामध्ये नागरिकांना वैद्यकीय सुविधा व शासकीय योजनांचा लाभ मिळवून





देण्यासाठी स्वतंत्र कक्ष कार्यरत आहे. या अंतर्गत या वर्षामध्ये १८४ रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता योजनेमधून १ कोटी ८४ लाख रुपये, तर टाटा ट्रस्ट, श्री.सिद्धिविनायक ट्रस्ट मुंबई, इफको कंपनी, श्री.साईबाबा संस्थान शिर्डी यांच्या माध्यमातून २२ लाख रुपयांची मदत या रुग्णांना मिळून देण्यात आली आहे. दिवसेंदिवस वाढत चाललेले आजार आणि या आजारांवर होणारा खर्च हा सर्वसामान्य माणसांना परवडणारा नसतो. कुटुंबामध्ये आलेला आजार हा त्या कुटुंबाची आर्थिक व्यवस्था कोलमडून टाकतो. अशावेळी सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळावा याकरता शासकीय योजनांच्या माध्यमातून यशोधन कार्यालयाच्या वतीने पाठपुरावा करून या गरजू नागरिकांना मदत मिळून दिली जात आहे.

या अंतर्गत मुख्यमंत्री सहाय्यता निधी व विविध धर्मदाय संस्थांच्या वतीने गरजू नागरिकांना मदत करण्यात येते. याकरता हॉस्पिटल मधील अपेक्षित खर्च, आधार कार्ड, रेशन कार्ड, वैद्यकीय दाखला, या कागदपत्रांसह यशोधन कार्यालयाकडून सातत्याने पाठपुरावा करून मुख्यमंत्री सहाय्यता कक्षातून लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या पाठपुराव्यामधून नागरिकांना मदत मोठी मिळवून दिली आहे.

याचबरोबर तालुक्यातील नागरिकांच्या आरोग्य सुविधेसाठी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या वतीने तालुक्यामध्ये विविध ठिकाणी सातत्याने आरोग्य शिबिर घेण्यात आली आहे. या आरोग्य शिबिरांमधून २२५३ नागरिकांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली आहे. तर डॉ.जयश्रीताई थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली महिलांकरता विशेष कॅन्सर तपासणीचे १२ शिबिर घेण्यात आले यामधून ९१२ महिलांची कॅन्सरच्या विविध तपासण्या करण्यात आल्या आहेत. यामधून काही महिलांना प्राथमिक लक्षणे आढळल्याने त्यांना पुढील उपचारासाठी एसएमबीटी सेवाभावी ट्रस्टच्या माध्यमातून वैद्यकीय उपचार केले जात आहे.

तसेच संगमनेर तालुक्यामध्ये विविध हॉस्पिटलमध्ये ॲडमिट होणाऱ्या नागरिकांना बेड साठी किंवा बिल कमी करण्यासाठी हा कक्ष काम करत आहे. आरोग्य सेवेच्या लाभाकरता नागरिकांनी तातडीने यशोधन कार्यालय मध्ये संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे. याकरता ७०२०६४१२९६ अविनाश आव्हाड यांच्या क्रमांकावर संपर्क साधावा.

# लाखो शिधापत्रिकाधारकांना दिलासा

## धान्य वितरणाची मुदत ३० जूनपर्यंत वाढली

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यातील लाखो शिधापत्रिकाधारक लाभार्थ्यांना दिलासा देणारा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर महाराष्ट्रातील स्वस्त धान्य दुकानांमधून धान्य वितरणाची मुदत ३० जून २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. त्यामुळे अद्याप धान्य न मिळालेल्या लाखो लाभार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे.

यापूर्वी धान्य वितरणाची अंतिम मुदत १५ जून निश्चित करण्यात आली होती. मात्र, त्या कालावधीत राज्यातील सुमारे ७५ टक्के लाभार्थ्यांपर्यंतच धान्य



पोहोचले होते, तर जवळपास २५ टक्के लाभार्थी विविध कारणांमुळे धान्यापासून वंचित राहिले होते.कोणताही पात्र लाभार्थी धान्यापासून वंचित राहू नये, यासाठी मंत्री छगन भुजबळ यांनी केंद्र सरकारकडे मुदतवाढीची मागणी केली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला सकारात्मक प्रतिसाद देत केंद्राने धान्य वितरणासाठी ३० जूनपर्यंत मुदतवाढ मंजूर केली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील लाखो लाभार्थ्यांना त्यांच्या हक्काचे धान्य मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, उद्यापासून स्वस्त धान्य दुकानांमधून पुन्हा वितरण प्रक्रिया सुरू होणार आहे.

मंत्री भुजबळ यांनी केंद्रीय अन्न व सार्वजनिक वितरण मंत्री प्रल्हाद जोशी यांच्याशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून महाराष्ट्रातील परिस्थितीची माहिती दिली होती. तसेच उर्वरित लाभार्थ्यांना धान्याचा लाभ मिळावा यासाठी वितरणाची मुदत वाढविण्याची विनंती केली होती.

मंत्री भुजबळ यांच्या या मागणीची दखल घेत केंद्र शासनाने महाराष्ट्रासाठी धान्य वितरणाची मुदत ३० जूनपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे.

# कर्जमाफीचा गाजावाजा, पण ७० टक्के शेतकरी वंचित- पवार

मुंबई (वृत्तसंस्था)

राज्य सरकारच्या कर्जमाफी योजनेवर राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी जोरदार टीका केली आहे. सरकार शेतकरी कर्जमाफीबाबत कितीही दावे करत असले तरी प्रत्यक्षात जाचक अटी-शर्तींमुळे मोठ्या प्रमाणात शेतकरी लाभापासून वंचित राहत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. यासंदर्भात त्यांनी सोशल मीडियावर पोस्ट करत सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

रोहित पवार यांनी सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची आकडेवारी समोर ठेवत



सरकारच्या कर्जमाफी योजनेचे वास्तव उघड होत असल्याचा दावा केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, या बँकेतून कर्ज घेतलेल्या २३ हजार ९२० शेतकऱ्यांचे जून २०२५ अखेरपर्यंत सुमारे ३७० कोटी रुपयांचे कर्ज थकीत आहे.सरकारने घातलेल्या अटी-शर्तींमुळे या थकीत कर्जदारांपैकी केवळ ७ हजार ५६६ शेतकरीच कर्जमाफीसाठी पात्र ठरत आहेत. या शेतकऱ्यांचे सुमारे १२८ कोटी रुपयांचे पीककर्ज माफ होणार आहे. म्हणजेच एकूण थकबाकीदारांपैकी फक्त ३० टक्के शेतकऱ्यांनाच कर्जमाफीचा लाभ मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

उर्वरित तब्बल ७० टक्के शेतकरी सरकारच्या जाचक निकषांमध्ये अडकून कर्जमाफीपासून वंचित राहणार असल्याचा आरोप रोहित पवार यांनी केला. त्यामुळे सरकारची ही योजना सर्वसमावेशक नसून निवडक शेतकऱ्यांपुरतीच मर्यादित असल्याचे ते म्हणाले.

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात
अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु||, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी
• हृदयरोग (Heart Diseases)
• मेंदूरोग (Brain Diseases)
• कर्करोग शस्त्रक्रिया
• अपघात (Accident)
• लहान बालकांची शस्त्रक्रिया
• गुडघ्याचे प्रत्यारोपण
• विद्युत अपघात रुग्ण
• कर्करोग (केमोथेरपी रेडिएशन)
• डायलिसिस
• अपघात शस्त्रक्रिया
• खुबा प्रत्यारोपण
• मेंदूत रक्तस्त्राव होणे / मेंदूत रक्त गोठणे.
अंतर्गत अर्थसहाय्य देण्यात येणारे आजार
२४ तास सुविधांसाठी
०२४२५ - २२४७६२
मोबा. ७०३८२७०३८२
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर










आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# उद्योजक माणिकराव डावरे यांच्या वाढदिवसानिमित्त १४५ दात्यांचे रक्तदान

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले प्रतिनिधी- रोटरी क्लब अकोले सेंट्रल हे समाजाची गरज ओळखून कार्य करणारी संस्था असून गेल्या चार वर्षांपासून माझ्या वाढदिवसानिमित्त समाजाची गरज लक्षात घेऊन रक्तदान शिबिराचे आयोजन करते हे खऱ्या अर्थाने मला दिलेली वाढदिवसाची अनमोल भेट असल्याचे व माझा वाढदिवस रक्तदान शिबिराने साजरा होतोय हे माझे भाग्य असल्याचे प्रतिपादन तालुक्याचे भूमिपुत्र, उद्योजक माणिकराव डावरे यांनी केले.

त्यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून रोटरी क्लब अकोले सेंट्रल च्या वतीने चाकण येथे प्रोफाईव्ह इंजिनिअरिंग कंपनी मध्ये भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. रोटरी क्लब च्या आवाहनाला सकारात्मक प्रतिसाद देत १४५ रक्तदात्यांनी रक्तदान करून आपले राष्ट्रीय कर्तव्य पार पाडले. हडपसर(पुणे )येथील अक्षय ब्लड बँक व त्यांचे दीपक देशमुख व त्यांच्या टीमचे या रक्तदान शिबीरासाठी मोठे सहकार्य लाभले. यावेळी उद्योजक माणिकराव डावरे यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात संपन्न झाला. यावेळी रोटरी क्लब चे डिस्ट्रिक्ट डायरेक्टर तथा आनंदगड पॉलिटेक्निक कॉलेज चे को-ऑर्डीनेटर प्रा. विद्याचंद्र सातपुते, आटोमॅक कंपनीचे सुपरवायझर तुकाराम घोलप, प्रवरा विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक तथा रोटरी क्लब चे सदस्य शांताराम मालुंजकर, उद्योजक नितीनसेठ कड, डॉ. बाळासाहेब ननवरे, संतोषसेठ पवळे, पंडितसेठ कड, किसनसेठ मुरे,चंद्रकांत गायकवाड, भाऊसाहेब घोमल, अजित डावरे, सुधीर डावरे उपस्थित होते. माणिकराव डावरे यांचा शाल,बुके व केक कापून सत्कार करण्यात आला. यावेळी माणिकराव डावरे पुढे म्हणाले की, असे सामाजिक उपक्रम यापुढे मोठ्या स्वरूपात केले जातील.माझें आई वडील हे शिक्षक असल्याने त्यांच्या संस्काराने समाजासाठी सामाजिक कार्य करण्याची प्रेरणा मला मिळाली. मी केलेल्या मदतीने विद्यार्थ्यांना कसा फायदा झाला हे जेव्हा शिक्षक फोन करून,प्रत्यक्ष भेटून सांगतात त्यावेळी आपले कार्य सार्थकी लागल्याचे समाधान मिळते. रोटरी क्लब हे त्यांच्या उद्दिष्टप्रमाणे काम करताना योग्य संधीचा उपयोग समाजहितासाठी करतात हे कौतुकास्पद आहे. असे मत व्यक्त केले

माझ्या वाढदिवसा निमित्ताने आपण सर्व स्तरातील मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सर्वांनी टीम वर्क ने काम केल्यास निश्चित त्यातून चांगले कार्य घडते. असे मत व्यक्त केले. यावेळी प्रा. विद्याचंद्र सातपुते, तुकाराम घोलप, मुख्याध्यापक शांताराम मालुंजकर, प्रमोद आठल्ये, प्रकाश चव्हाण,विशाल मालुंजकर, आदींनी आपले मनोगत व्यक्त करून उद्योजक माणिकराव डावरे यांचा यशस्वी जीवनाचा आढावा घेतला.

# अमृतवाहिनी आयटीआयच्या २४३ विद्यार्थ्यांची नामांकित कंपन्यांत निवड



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - अमृतवाहिनी आयटीआय, अमृतनगर येथे दिनांक ११ जून २०२६ रोजी नामांकित कंपन्यांचे कॅम्पस इंटरव्यू झाले यात सुमारे २४३ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वी कंपन्यांमध्ये निवड झाली असल्याची माहिती प्राचार्य विलास भाटे यांनी दिली आहे.

याविषयी अधिक माहिती देताना भाटे म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात व माजी आमदार डॉ. सुधीर तांबे आणि संस्थेच्या कार्यकारी विश्वस्थ सौ. शरयूताई देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली अमृतवाहिनी आयटीआय सातत्याने गुणवत्तापूर्ण शिक्षणाला प्राधान्य दिले आहे. त्याचाच एक भाग म्हणून आता अमृतवाहिनीच्या २४३ विद्यार्थ्यांची अंतिम परीक्षा पूर्वी नामांकित कंपन्यांमध्ये निवड झाली आहे.

नामांकित कंपन्यांनी अंतिम वर्षाच्या मेकॅनिक मोटर व्हेईकल, मेकॅनिक डिझेल, फिटर इलेक्ट्रिशियन, वायरमन, कॉम्प्युटर ऑपरेटर अँड प्रोग्रामिंग असिस्टंट या ट्रेनच्या विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. यात महिंद्रा अँड महिंद्रा, नाशिक मध्ये ८० विद्यार्थी, महिंद्रा अँड महिंद्रा,चाकण येथे ८६ विद्यार्थी, मरेली मदर्सन लाईटींग इंडिया या कंपनीत ४० विद्यार्थी, मल्टीकाँटन्स इंडस्ट्रियल कंट्रोल ,सिन्नर मध्ये १५, जे बी एम ग्रुप, सिन्नर मध्ये २२ विद्यार्थी अशा एकूण २४३ विद्यार्थ्यांची निवड झाली आहे.

अत्याधुनिक सुविधा आणि प्लेसमेंट साठी परिपूर्ण प्रयत्न असल्याने संस्थेच्या अनेक विद्यार्थ्यांना मोठ्या पगारावर थेट नोकरीच्या संधी मिळाल्या आहेत. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष माजी महसूल मंत्री बाळासाहेब थोरात, विश्वस्त मा. आ. डॉ सुधीर तांबे, कार्यकारी विश्वस्त सौ. शरयूताई देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल शिंदे, प्राध्यापक व्ही.बी धुमाळ, अकॅडमी डायरेक्टर डॉ जे बी गुरव, प्राचार्य विलास भाटे आदींनी अभिनंदन केले आहे.

# विद्यार्थी आरोग्य जागृती अभियानांतर्गत मार्गदर्शन



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाऊंडेशन संचालित श्री सुखप्रदा हॉस्पिटल, ब्राह्मणवाडा, सह्याद्री विद्यालय ब्राह्मणवाडा आणि अकोले तालुका मेडिकल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यार्थ्यांसाठी विशेष आरोग्य जनजागृती व्याख्यानांचे आयोजन करण्यात आले.

दि. २४ जून रोजी सह्याद्री विद्यालयात झालेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना आरोग्यविषयक महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करण्यात आले. विश्व हिंदू परिषदेचे केंद्रीय सहमंत्री तथा प्रवक्ते शंकरजी गायकर यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात पौगंडावस्थेत मुलींमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल तसेच घ्यावयाची काळजी आणि मुखदंत आरोग्य व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम या विषयांवर तज्ज्ञ डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. रश्मी घोलप यांनी पौगंडावस्थेतील मुलींमध्ये होणारे शारीरिक व मानसिक बदल, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची स्वच्छतेची काळजी, संतुलित आहाराचे महत्त्व आणि महिलांमधील विविध आरोग्य समस्यांबाबत सविस्तर माहिती दिली. विद्यार्थिनींच्या शंकांचेही त्यांनी समाधानकारक निरसन केले. यानंतर दंतविकारतज्ज्ञ डॉ. प्रतीक घोडके यांनी मुखदंत आरोग्य व व्यसनाधीनतेचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन करत दातांची योग्य निगा, दात घासण्याची पद्धत, टूथब्रश व टूथपेस्टची निवड याविषयी प्रात्यक्षिकासह माहिती दिली. तंबाखू, गुटखा, सिगारेट आदी व्यसनांमुळे होणारे गंभीर आजार आणि कॅन्सरचा धोका याबाबत विद्यार्थ्यांना जागरूक करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप भाटे यांनी केले. त्यांनी आदिम आदिवासी आरोग्यवर्धिनी फाऊंडेशनच्या विविध सामाजिक व आरोग्यविषयक उपक्रमांची माहिती देत आगामी समाजोपयोगी प्रकल्पांचा आढावा उपस्थितांसमोर मांडला. यावेळी श्री वरदविनायक देवस्थान, कोतुळ यांच्या सहकार्याने सुरू होणाऱ्या रुग्णोपयोगी साहित्य बँक या महत्त्वाकांक्षी उपक्रमाची माहिती देण्यात आली. या माध्यमातून अपघातग्रस्त, ब्रेन स्ट्रोकग्रस्त व दीर्घकाळ अंथरुणाला खिळलेल्या रुग्णांसाठी वॉटर बेड, एअर बेड, वॉकर, फाऊलर बेड, ऑक्सिजन कॉन्सन्ट्रेटर, ऑक्सिजन सिलेंडर यांसारखे वैद्यकीय साहित्य नाममात्र दरात उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. यासाठी दानशूर व्यक्तींनी आर्थिक व साहित्य स्वरूपात सहकार्य करण्याचे आवाहन करण्यात आले.

कार्यक्रमास प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. विवेक घायाळ व आरोग्य कर्मचारी, विद्यालयाच्या प्राचार्या सुनीता शेलार मॅडम, पर्यवेक्षक दारोळे सर,प्रा. जनार्धन हासे, शांताराम साबळे, डॉ.सतिष वाळुंज यांच्या सह विद्यार्थी-विद्यार्थिनी तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. भरत दिघे यांचे निसर्गा अॅक्वा,"शिवनिश मिनरल वॉटर" पाणी बॉटल ग्राहकांच्या सेवेत




संगमनेर तालुक्यातील तळेगावचे भूषण तसेच बिरोबा हॉस्पिटलचे संचालक, निसर्गा बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक, डॉ.भरत दिघे व राजश्री दिघे यांच्या परिवाराने नूतन निसर्गा क्वाचा प्लांट सूरू केला असुन शिवनिश मिनरल वॉटर या नावाने पाणी बॉटलच्या व्यवसात पदार्पण केले आहे. पाण्याची टेस्ट देखील अतिशय उत्तम आणि मनाला हवेहवेसे वाटणारी आहे. त्यामुळे येणाऱ्या काळात त्यांची या व्यवसायात उत्तम भरभराटी व्हावी अशी शुभेच्छा अनेक मान्यवरांनी भेट देऊन व्यक्त केल्या आहेत.

# ग्रामीण शिक्षणासमोरील मोठे संकट

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बंद होण्याच्या मार्गावर

ग्रामीण भागातील शिक्षणाचा पाया मानल्या जाणाऱ्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा आज अस्तित्वाच्या संघर्षाला सामोऱ्या जात आहेत. विद्यार्थी संख्या घटणे, खासगी शाळांकडे वाढता कल, स्थलांतर आणि बदलती शैक्षणिक परिस्थिती यामुळे अनेक जिल्हा परिषद शाळा बंद होण्याच्या मार्गावर आहेत. ही परिस्थिती ग्रामीण शिक्षण व्यवस्थेसाठी गंभीर चिंतेचा विषय बनली आहे.

एकेकाळी गावागावातील मुलांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्यात जिल्हा परिषद शाळांची महत्त्वपूर्ण भूमिका होती. या शाळांमधून अनेक अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, अभियंते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर घडले. मात्र गेल्या काही वर्षांत इंग्रजी माध्यमाच्या खासगी शाळांचे आकर्षण वाढल्याने पालकांचा कल त्या शाळांकडे वळला आहे. परिणामी जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थी संख्या सातत्याने कमी होत आहे.

ग्रामीण भागातून रोजगाराच्या शोधात शहरांकडे होणारे स्थलांतर हे देखील विद्यार्थी संख्या घटण्यामागील एक प्रमुख कारण आहे. अनेक गावांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या अत्यल्प झाल्याने काही शाळा एकत्र करण्याचा किंवा बंद करण्याचा विचार प्रशासनाकडून केला जात आहे. याचा थेट परिणाम ग्रामीण विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर होऊ शकतो.

जिल्हा परिषद शाळा बंद झाल्यास गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबांतील विद्यार्थ्यांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागू शकतो. जवळपास दुसरी शाळा नसल्यास विद्यार्थ्यांना लांब अंतर पार करून शिक्षणासाठी जावे लागेल. विशेषतः मुलींच्या शिक्षणावर त्याचा नकारात्मक परिणाम होण्याची शक्यता आहे. शिक्षणापासून वंचित राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढू शकते.




या परिस्थितीवर मात करण्यासाठी शासन आणि स्थानिक प्रशासनाने प्रभावी उपाययोजना करणे आवश्यक आहे. शाळांमध्ये आधुनिक सुविधा, डिजिटल शिक्षण, गुणवत्तापूर्ण अध्यापन आणि क्रीडा-सांस्कृतिक उपक्रमांना प्राधान्य देणे गरजेचे आहे. पालकांमध्ये जिल्हा परिषद शाळांविषयी विश्वास निर्माण करण्यासाठी विशेष प्रयत्न केले पाहिजेत. तसेच शिक्षक, ग्रामपंचायत, शाळा व्यवस्थापन समिती आणि नागरिकांनी संयुक्तपणे शाळा टिकविण्यासाठी पुढाकार घेणे आवश्यक आहे.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा या केवळ शिक्षण संस्था नसून ग्रामीण समाजाच्या विकासाचा आधारस्तंभ आहेत. या शाळा टिकल्या तरच ग्रामीण भागातील शिक्षणाची गंगा अखंडपणे वाहत राहील. त्यामुळे जिल्हा परिषद शाळा बंद होण्यापासून वाचविणे ही केवळ प्रशासनाची नव्हे तर संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. ग्रामीण शिक्षणाचा हा पाया मजबूत राहणे हेच देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

# भाजीपाला व कांदा मूल्यसाखळी विकासासाठी शिर्डीत राज्यस्तरीय परिषद



युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - महाराष्ट्रातील भाजीपाला क्षेत्र अधिक शाश्वत, स्पर्धात्मक आणि बाजाराभिमुख करण्याच्या उद्देशाने इंडो व्हेजिटेबल्स डेव्हलपमेंट असोसिएशन (आयव्हीडीए) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय भाजीपाला मूल्यसाखळी परिषद शिर्डी येथे उत्साहात पार पडली. महाराष्ट्र शासन व जागतिक बँकेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या बाळासाहेब ठाकरे कृषी व्यवसाय व ग्रामीण परिवर्तन (स्मार्ट) प्रकल्पा अंतर्गत स्थापन करण्यात आलेल्या वस्तू व्यवस्थापन परिषद उपक्रमाच्या माध्यमातून या परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. भाजीपाला मूल्यसाखळी अधिक सक्षम करण्यासाठी शाश्वत शेती, गुणवत्ता मानके आणि बाजारपेठेतील संधी यावर परिषदेत सखोल चर्चा करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. आयव्हीडीएचे उपाध्यक्ष डॉ. संतोष सहाणे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले, तर अध्यक्ष सारंगधर निर्मळ यांनी परिषदेची भूमिका स्पष्ट केली. माजी कुलगुरू डॉ. के. ई. लवांडे यांनी शाश्वत शेतीचे महत्त्व अधोरेखित केले. महाराष्ट्र व्हिलेज सोशल ट्रान्सफॉर्मेशन फाउंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. उमाकांत दांगट यांनी मूल्यसाखळी विकासासाठी सर्व घटकांनी एकत्रित प्रयत्न करण्याची गरज व्यक्त केली. महानंदचे व्यवस्थापकीय संचालक अनिल हातेकर यांच्यासह डॉ. भाग्यश्री टिळेकर आणि प्रियांका भोसले यांचीही विशेष उपस्थिती होती.

परिषदेत दोन तांत्रिक चर्चासत्रे आणि एक नवउद्योजक संवाद सत्र आयोजित करण्यात आले. पहिल्या सत्रात मृदा आरोग्य संवर्धन, जैविक निविष्ठांचा वापर, शाश्वत शेती, अवशेषमुक्त आणि सेंद्रिय उत्पादन पद्धती यावर चर्चा झाली. तज्ज्ञांनी अवशेषमुक्त आणि विषमुक्त शेतीला देशांतर्गत तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी असल्याचे सांगितले. निर्यातक्षम उत्पादनांसाठी प्रमाणन व्यवस्था मजबूत करण्याची गरज व्यक्त करण्यात आली. शेतकऱ्यांनी स्वतःच्या शेतावर जैविक निविष्ठा तयार कराव्यात तसेच मृदा परीक्षणाच्या आधारे निविष्ठांचा वापर करावा, असे आवाहन करण्यात आले.

दुसऱ्या सत्रात कांदा मूल्यसाखळी विकास या विषयावर चर्चा झाली. कांदा बियाणे प्रमाणन प्रक्रिया अधिक सक्षम करणे, गुणवत्तापूर्ण बियाण्यांची उपलब्धता वाढवणे, लागवड क्षेत्र व उत्पादनाचा एकात्मिक माहिती संच तयार करणे आणि बाजारातील पारदर्शकता वाढविणे यावर भर देण्यात आला. कांदा पुरवठा साखळीत मागोवा प्रणाली विकसित केल्यास शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाचा योग्य मोबदला मिळू शकतो, असे तज्ज्ञांनी नमूद केले. तसेच जैवखते व जैविक निविष्ठांचा वापर वाढवून उत्पादन खर्च कमी करण्याचे आवाहन करण्यात आले.

यानंतर झालेल्या नवउद्योजक संवाद सत्रात कृषी क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञानाधारित उपाययोजना, मृदा आरोग्य व्यवस्थापन आणि शेतकरी सक्षमीकरण यावर चर्चा झाली. कृषी क्षेत्रातील नवउद्योजकता, तंत्रज्ञानाचा वापर आणि शाश्वत विकासासाठी नव्या उद्योगांची भूमिका महत्त्वाची असल्याचे वक्त्यांनी सांगितले.

# संपादकीय...

## लखनौ अग्नितांडव

## व्यवस्थेच्या अपयशाचा जळता पुरावा

लखनौमधील कोचिंग सेंटरमध्ये घडलेले भीषण अग्नितांडव मानवतेला हादरवून सोडणारे आहे. या दुर्घटनेत अनेक निष्पाप विद्यार्थ्यांना आपला जीव गमवावा लागला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. ही घटना केवळ एक अपघात नसून प्रशासनातील निष्काळजीपणा, नियमांची पायमल्ली आणि भ्रष्ट व्यवस्थेचे विदारक वास्तव अधोरेखित करणारी आहे. २२ जून २०२६ रोजी लखनौच्या अलीगंज भागातील एका तीन मजली व्यावसायिक इमारतीला भीषण आग लागली. या दुर्घटनेत १५ विद्यार्थ्यांचा गुदमरून व होरपळून मृत्यू झाला, तर अनेक जण गंभीर जखमी झाले. शिक्षणाचे केंद्र असलेले कोचिंग सेंटर क्षणात मृत्यूचे केंद्र बनले.

प्राथमिक माहितीनुसार संबंधित कोचिंग सेंटरमध्ये क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थी होते. अग्निसुरक्षा उपाययोजना, आपत्कालीन बाहेर पडण्याचे मार्ग आणि सुरक्षा नियमांचे पालन यांचा गंभीर अभाव होता. अशा परिस्थितीत प्रशासनाने वेळेवर तपासणी व कारवाई केली असती तर ही दुर्घटना टाळता आली असती. आज दुर्घटनेनंतर संबंधितांवर कारवाई आणि बुलडोझरची कारवाई होत असली तरी ती उशिराने झालेली प्रतिक्रिया असल्याची भावना सर्वसामान्यांमध्ये आहे. देशात अग्निसुरक्षा, बांधकाम नियम, परवानग्या आणि विविध कायदे अस्तित्वात आहेत; मात्र त्यांची प्रभावी अंमलबजावणी होताना दिसत नाही. अनेक ठिकाणी भ्रष्टाचाराच्या माध्यमातून आवश्यक ना-हरकत प्रमाणपत्रे मिळवली जातात. परिणामी कोचिंग क्लासेस, हॉटेल्स, लॉज, रुग्णालये आणि इतर सार्वजनिक ठिकाणे आजही असुरक्षित असल्याचे वास्तव समोर येत आहे.

लखनौ दुर्घटना ही काही पहिली घटना नाही. ३ जून २०२६ रोजी दिल्लीतील मालवीय नगर येथील हॉटेल आगीत २१ जणांचा मृत्यू झाला होता. डिसेंबर २०२५ मध्ये गोव्यातील अर्पोरा येथील नाइट क्लबमध्ये लागलेल्या आगीत २५ जणांचा मृत्यू झाला होता, तर मे २०२५ मध्ये हैदराबादच्या चारमिनार परिसरातील भीषण आगीत १७ जणांचा जीव गेला होता. अशा अनेक दुर्घटना देशभरात सातत्याने घडत आहेत. वाढते शहरीकरण, सुरक्षाविषयक नियमांकडे होणारे दुर्लक्ष आणि भ्रष्टाचार यामुळे अशा दुर्घटनांचे प्रमाण वाढत असल्याची चिंता व्यक्त केली जात आहे. अनेकदा दुर्घटना घडल्यानंतर चौकशी समित्या नेमल्या जातात; मात्र भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आवश्यक ती कठोर आणि सातत्यपूर्ण कार्यवाही होताना दिसत नाही. लखनौ अग्नितांडवानंतर नागपूरमध्ये अग्निशमन विभागाने केलेल्या तपासणीत तब्बल १०३ कोचिंग क्लासेस धोकादायक श्रेणीत आढळले. ही केवळ एका शहराची स्थिती असेल तर राज्य आणि देशातील इतर भागांची परिस्थिती किती गंभीर असू शकते, याची कल्पना सहज करता येते. लोकांचा जीव गेल्यानंतरच प्रशासन आणि सरकारला जाग येते, ही आपल्या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका आहे. त्यामुळे लखनौ अग्नितांडव हा केवळ उत्तर प्रदेशपुरता मर्यादित विषय नसून संपूर्ण देशासाठी एक गंभीर इशारा आहे. केंद्र आणि राज्य सरकारांनी या घटनेतून धडा घेत सार्वजनिक ठिकाणांच्या अग्निसुरक्षेचे नियमित लेखापरीक्षण, कठोर अंमलबजावणी आणि दोषींवर तातडीने कारवाई करण्याची गरज आहे. नागरिकांच्या जीवितापेक्षा कोणतीही गोष्ट महत्त्वाची असू शकत नाही. त्यामुळे भविष्यात अशा दुर्घटना टाळण्यासाठी शासन, प्रशासन आणि समाज या तिन्ही घटकांनी सजग आणि जबाबदार भूमिका घेणे ही काळाची गरज आहे.

# ‘अमृत मानस मित्र’ प्रशिक्षण कार्यक्रमाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात करिअरच्या सुवर्णसंधी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - विद्यार्थ्यांचे मानसिक आरोग्य, भावनिक सक्षमीकरण आणि समुपदेशन सेवा अधिक प्रभावी करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था ‘अमृत’च्या वतीने ‘अमृत मानस मित्र’ समुपदेशक प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. मानसिक आरोग्य क्षेत्रात अर्थपूर्ण करिअर घडवू इच्छिणाऱ्या युवक-युवतींसाठी हा उपक्रम सुवर्णसंधी ठरणार असून पात्र उमेदवारांनी या प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे. इच्छुक उमेदवारांनी हीींि://ारहररीीी.ीस.ळप या संकेतस्थळावर आवश्यक कागदपत्रांसह ऑनलाइन अर्ज करावा. प्राप्त अर्जांची छाननी करून प्रबोधन सत्र, आवश्यक परीक्षा अथवा मुलाखतीद्वारे पात्र उमेदवारांची निवड करण्यात येणार आहे. उमेदवारांचा संबंधित क्षेत्रातील अनुभव विचारात घेऊन तसेच ‘प्रथम येणाऱ्यास प्राधान्य’ या तत्त्वानुसार अंतिम निवड करण्यात येईल. पहिल्या बॅचसाठी अर्ज करण्याची अंतिम मुदत २९ जून २०२६ आहे.

या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था (एमआयएमएच), पुणे ही महाराष्ट्र शासनाची मानसिक आरोग्य क्षेत्रातील अग्रगण्य संस्था तांत्रिक व शैक्षणिक भागीदार म्हणून कार्य करणार आहे. मानसिक आरोग्य, विद्यार्थी समुपदेशन, भावनिक आधार, संवाद कौशल्ये, सक्रिय श्रवण कौशल्ये, सहानुभूतीपूर्ण प्रतिसाद, संकट व्यवस्थापन, जीवनकौशल्ये आणि मनोसामाजिक सहाय्य या विषयांवर आधारित हा अभ्यासक्रम असून सहभागी उमेदवारांना प्रत्यक्ष कार्यक्षम समुपदेशक म्हणून विकसित करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या उमेदवारांना अमृत आणि महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था यांचे संयुक्त अधिकृत प्रमाणपत्र प्रदान करण्यात येणार आहे. पुणे येथे १५ दिवसांचे निवासी स्वरूपातील ऑफलाइन प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार असून त्यामध्ये संवादात्मक सत्रे, प्रकरण अभ्यास, प्रात्यक्षिक उपक्रम आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन दिले जाईल. त्यानंतर एक महिन्याचा क्षेत्रीय प्रशिक्षण व अनुभव कार्यक्रम राबविण्यात येणार असून सहभागी उमेदवारांना जिल्हास्तरावरील शाळा किंवा महाविद्यालयांशी जोडले जाईल. पुढील तीन ते पाच महिन्यांच्या कालावधीत तज्ज्ञांकडून सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पर्यवेक्षण, ऑनलाइन सत्रे आणि व्यावसायिक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. संपूर्ण प्रशिक्षण महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे येथील तज्ज्ञ मार्गदर्शकांकडून देण्यात येणार असून अमृतमार्फत विविध तज्ज्ञांचे अनुभवाधारित मार्गदर्शन व सहकार्यही मिळणार आहे. प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतरही प्रकरण चर्चा, ऑनलाइन पर्यवेक्षण, मार्गदर्शन सत्रे, प्रत्यक्ष कामातील अडचणींचे निराकरण, व्यावसायिक सल्ला तसेच कौशल्यवृद्धीसाठी सातत्यपूर्ण सहकार्य उपलब्ध राहणार आहे.

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० नुसार कौशल्याधारित शिक्षण, समाजाभिमुख प्रशिक्षण आणि रोजगारक्षमतेवर विशेष भर देण्यात आला आहे. तसेच शाळा व महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या समुपदेशनासाठी आवश्यक व्यवस्था उभारण्यास प्राधान्य दिले जात आहे. या पार्श्वभूमीवर ‘अमृत मानस मित्र’ उपक्रम राज्यात प्रशिक्षित विद्यार्थी समुपदेशक तयार करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या प्रशिक्षणाद्वारे मानसिक आरोग्य क्षेत्रात कार्य करण्याची संधी, रोजगारक्षम कौशल्यांचा विकास, सामाजिक संस्थांमधील रोजगाराच्या संधी तसेच व्यावसायिक नेटवर्किंगची संधी उपलब्ध होणार आहे. एम.ए./एम.एस्सी. मानसशास्त्र, एम.ए./एम.एस्सी. (समुपदेशन मानसशास्त्र) किंवा मास्टर ऑफ सोशल वर्क (एमएसडब्ल्यू) पदवीधारक उमेदवार अर्ज करण्यास पात्र आहेत. संबंधित क्षेत्रात पूर्वानुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य दिले जाणार आहे.

# स्वस्त धान्य...

पान १ वरून - तसेच धान्य वाहतुकी दरम्यान काही ठिकाणी हमालांकडून अवैध स्वरूपात रकमेची मागणी होत असल्याच्या तक्रारी आहेत. या सर्व प्रकारांची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणीही आमदार खताळ यांनी केली.

काही महिन्यां पासून ई-पॉस मशीनमधील फिंगर प्रिंट स्कॅनर व्यवस्थित कार्यरत नसल्याने लाभार्थी व दुकानदारांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे धान्य वितरण प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होत असून या यंत्रणेमध्ये तातडीने सुधारणा करण्यात यावी, असे हीं आमदार खताळ यांनी सभागृहात सांगितले. तसेच प्राधिकारपत्र नूतनीकरणाच्या प्रक्रियेत फूड लायसन्सची सक्ती रद्द करण्यात यावी. संस्था व बचतगटां कडून बँक स्टेटमेंट व लेखापरीक्षण अहवाल सादर केला जात असल्यामूळे नोंदणी कार्यालयाच्या स्वतंत्र दाखल्याची अट शिथिल करण्यात यावी.अशी मागणीही केली. हा विषय सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या कार्यक्षमतेशी संबंधित असून हजारो लाभार्थी व स्वस्त धान्य दुकानदारांच्या हिताचा आहे. त्यामुळे शासनाने या सर्व मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घेऊन संबंधित प्रश्न मार्गी लावावेत, अशी जोरदार मागणी आमदार अमोल खताळ यांनी विधिमंडळात केली.

# जीएसटी परिषदेत ...

पान १ वरून - परिषदेची पुढील बैठक होण्यापूर्वी राज्य सरकारने सर्व पक्षांच्या आमदारांकडून लेखी सूचना मागवाव्यात. त्या सूचनांच्या आधारे महाराष्ट्र सरकारने एकत्रित प्रतिनिधित्व तयार करून केंद्र सरकार आणि जीएसटी परिषदेकडे पाठवावे. मुख्यमंत्री तथा अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेच जीएसटी विभागाची जबाबदारी असल्याने या प्रक्रियेस पुढाकार घेऊन महाराष्ट्राच्या वतीने सकारात्मक भूमिका मांडावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली. राज्यातील विविध घटकांच्या अडचणी, स्थानिक स्वराज्य संस्थांवरील वाढता खर्च, शैक्षणिक व धर्मादाय संस्थांवरील आर्थिक भार तसेच जीएसटी प्रक्रियेतील आवश्यक सुधारणा या सर्व मुद्द्यांचा विचार करून राज्य सरकारने जीएसटी परिषदेत महाराष्ट्राची ठोस भूमिका मांडावी, अशी मागणी आमदार सत्यजीत तांबे यांनी केली.

# ग्रामीण भागातील लोड शेडिंग बंद करण्याची हरिश्चंद्र फेडरेशनची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - वीज नियामक आयोगाने संगमनेर तालुक्यात भंडारदरा धरणातून सुरू असलेल्या आवर्तन काळामध्ये ११ तास पूर्ण दाबाने वीजपुरवठा करावा असे आदेश दिलेले आहे. मात्र ग्रामीण भागात सातत्याने लाईट जात असून शेतकऱ्यांना मोठ्या समस्यांना सामोरे जावे लागत आहे. याकरता लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या नेतृत्वाखाली तालुक्यातील ग्रामीण भागात लोड शेडिंग बंद करावा अशी आग्रही मागणी हरिश्चंद्र सहकारी पाणीपुरवठा फेडरेशनने सातत्याने केली आहे.

संगमनेर तालुका व ग्रामीण भागामध्ये विजेचा खेळ खंडोबा झाला असून अनेक भागात व शहरात सातत्याने लोड शेडिंग मुळे लाईट बंद केली जाते. यामुळे शेतकरी विद्यार्थी नागरिक महिला त्रस्त असून ही लोडशेडिंग बंद करावी अशी वेळोवेळी मागणी केली आहे. लोड शेडिंग व विजेच्या अनियमित पुरवठ्यामुळे संगमनेर तालुका त्रस्त झाला आहे. राजकीय उद्देश ठेवून तालुक्यातील लाईट बंद करण्याचा डाव केला जातो की काय अशी शंका नागरिकांमध्ये व्यक्त झाल्याने अनेक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. संगमनेर तालुक्याला हक्काचे पाणी मिळावे व ११ तास लाईट मिळावी ही आग्रही मागणी काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांनी वेळोवेळी केली आहे. याचबरोबर डॉ. जयश्रीताई थोरात यांच्या युवा काँग्रेसच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने संगमनेर वीज वितरण विभागाकडे ही आग्रही मागणी केली आहे

याबाबत संगमनेर मधील कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने १९ मे २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय अहिल्यानगर व वीज वितरण विभागाचे अधीक्षक अभियंता यांची समक्ष भेट घेऊन याबाबतचे निवेदन दिले आहे. यावेळी मा. जिल्हाधिकारी व अधीक्षक अभियंता यांनी नागरिकांच्या मागणीचा विचार करून सकारात्मक विचार करू असे सांगितले होते. त्यानंतर हरिश्चंद्र पाणीपुरवठा फेडरेशनच्या वतीने १० जून २०२६ रोजी पुन्हा जिल्हाधिकारी कार्यालय व वीज वितरण विभाग यांना पत्र देण्यात आले. मात्र अद्यापही ग्रामीण भागात व शहरांमध्ये लोड शेडिंग मुळे लाईट बंद होते याचबरोबर रात्री सहा ते नऊ या वेळेमध्ये अनेकदा लाईट जाते. या काळामध्ये अनेकदा प्रवास होत असून ग्रामीण भागात अपघातांचे प्रमाण वाढत आहे. शेतकरी घराकडे येत असताना बिबट्यांची हल्ले होत आहेत..


## संगमनेर नगरपरिषद, संगमनेर

### जाहिर निविदा सूचना

**सन २०२६– २७ करिता दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके खरेदी**

संगमनेर नगरपरिषदेच्या वाचनालय विभागासाठी सन २०२६ - २७ या वर्षा करिता दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके खरेदी करावयाचे असून या कामी पुरवठादार / कोटेशनधारक यांना कळविण्यात येते की, संगमनेर नगरपरिषदेस खरेदी करावयाची दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके खरेदी यादी कार्यालयीन वेळेत न.पा. चे वाचनालयात पहावयास मिळेल.

तरी इच्छुक पुरवठाधारकांनी आपली मोहरबंद निविदा ही निविदा सूचना प्रसिद्ध झालेपासुन दि.१/७२०२६ अखेर सांय. ५-०० वा. पर्यंत नगरपरिषदेच्या नागरी सुविधा केंद्रात कार्यालयीन वेळेत सर्व पुर्तता सह जमा करावीत. प्राप्त निविदा शक्य झाल्यास त्याच दिवशी सांय ५.९० नंतर उघडण्यात येतील याची सर्वांनी नोंद घ्यावी.

अटी व शर्ती

१. आपली मोहरबंद निविदा स्वखर्चाने नगरपरिषद कार्यालया मध्ये पोहच करणे बंधनकारक राहील
२. इतर खर्च अथवा अटीयुक्त निविदा स्वीकारली जाणार नाही.
३. निविदेमधील दर हे एक वर्षा करिता ग्राह्य धरले जातील..
४. दैनिक वृत्तपत्रेची यादी न. पा. वाचनालयात पहावयास मिळेल.
५. कोणतीही निविदा मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार नगरपरिषदेने राखून ठेवले आहेत

(दयानंद गोरे) मुख्याधिकारी | सभापची शिक्षण समिती सौ. सातपुते अनुराधा | उपनगराध्यक्ष नूरमोहम्मद शेख | नगराध्यक्ष सौ. मैथिली तांबे

**संगमनेर नगरपरिषद, संगमनेर**

## - जाहीर नोटीस -

संजीवनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या संगमनेर (अवसायनात) या संस्थेवर माझी अवसायक म्हणुन नेमणुक झाली असून संस्थेची नोंदणी रद्द करणेबाबत अंतिम सर्वसाधारण सभा दिनांक २९/०६/२०२६ दु. २.०० रोजी मा. उपनिबंधक सहकारी संस्था संगमनेर, यशवंतराव चव्हाण प्रशासकीय इमारत, ३ मजला, नविन नगररोड, संगमनेर ता. संगमनेर जि. अहिल्यानगर येथे आयोजित करणेत आली आहे.

तरी याबाबत सभासद/इसम यांना काही म्हणणे/हरकत सादर करावयाचे असल्यास सदर वेळी लेखी/तोंडी खुलासा सादर करावा. याबाबत आपण गैरहजर राहील्यास संस्थेची नोंदणी रद्द करणेबाबत पुढील योग्य ती कार्यवाही करणेत येईल, यांची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण – संगमनेर
दिनांक – १७/०६/२०२६

अवसायक
संजीवनी सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या संगमनेर

SUBSCRIBE DAINIK YUVAVARTAYOUTUBE CHANNEL

**पाहिजेत**
श्रद्धा एजन्सी
ड्रायव्हर - २ जागा
जे. पी. रोड, रंगारगल्ली संगमनेर, जि. अ.नगर
— संपर्क —
9665557877

**पाहिजेत**
स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
महिला - ३
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

**भाड्याने देणे**
संगमनेर बस परिसरात, नासिक- पुणे हायवे लगत (तारा पान) च्या वर ऑफिस भाड्याने देणे आहे.
संपर्क
9922008706

**पाहिजेत**
संगमनेर मधील नामांकित कॅफेच्या मार्केटिंगसाठी अनुभवी प्रतिनिधी पाहिजे आहेत.
टू व्हिलर आवश्यक
8999795056

**पाहिजेत**
डॉक्टर्स ०२- महिला (बी.ए.एम.एस/एम.डी.)
पंचकर्म थेरपिस्ट - ४ (स्त्री/पुरुष) ट्रेनिंग दिले जाईल
रिसेप्शनिस्ट - २ (महिला) कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक
ओ. टी. अॅसिस्टंट - १ (पुरुष)
माधवबाग क्लिनिक
९३२५०२८६८६

**पाहिजेत**
मे. मोहनलाल बन्सीलाल दरडा
कॉम्प्युटर ऑपरेटर (१ जागा)
– पत्ता–
श्रद्धा फर्निचर शेजारी, अकोले रोड, संगमनेर
9822426782

## भाड्याने देणे आहे
**संगमनेर शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी**
२००० स्क्वेअर फिट ३ मजले, एकूण ६००० स्क्वेअर फिट बांधकाम असलेली प्रशस्त इमारत भाड्याने देणे आहे
● पिण्यासाठी नगरपालिकेचे नळ कनेक्शन ● वापरासाठी स्वतंत्र बोरिंग सुविधा
● थ्री फेज लाईट कनेक्शन उपलब्ध ● व्यवसाय, ऑफिस, क्लासेस, हॉस्पिटल, इत्यादींसाठी उत्तम जागा
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, सह्याद्री कॉलेजच्या पाठीमागे, संगमनेर, ता. संगमनेर , जि. अ.नगर
- संपर्क -
9822258458






# स्वच्छता, सुविधा आणि विकासासाठी आजी-माजी नगराध्यक्षांची सकाळची मोहीम



संगमनेर - शहराचा विकास हा केवळ कागदावरील आराखड्यांमधून होत नाही, तर तो रस्त्यावर उतरून, नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष पाहून आणि त्या सोडविण्यासाठी तात्काळ निर्णय घेण्याच्या वृत्तीतून घडत असतो. लोकनेते बाळासाहेब थोरात व आमदार सत्यजित तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली संगमनेरच्या नगराध्यक्ष डॉ. मैथिलीताई तांबे दररोज सकाळी स्कुटी गाडीवरून विविध प्रभागांना भेट देत स्वच्छतेची पाहणी करत असून नागरिकांच्या समस्या जाणून घेत तात्काळ सूचना करत आहेत.

सध्या संगमनेर शहरात वेगळी आणि सकारात्मक कार्यपद्धती पाहायला मिळत आहे. शहराच्या माजी नगराध्यक्षा सौ. दुर्गाताई तांबे आणि विद्यमान नगराध्यक्षा डॉ. मैथिलीताई तांबे या दोघी दररोज पहाटे सहा ते दहा वाजेपर्यंत शहर आणि उपनगरांमध्ये फेरफटका मारत नागरिकांच्या समस्या जाणून घेत आहेत. नगरपालिकेच्या कामकाजावर लक्ष ठेवत त्या विकासकामांची प्रत्यक्ष पाहणी करीत आहेत.

शहरातील एखादा रस्ता खराब असल्याचे दिसले, एखाद्या भागात स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला, कचरा उचलण्यात त्रुटी आढळल्या किंवा इतर नागरी सुविधा अपुऱ्या असल्याचे निदर्शनास आले तर त्यावर तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित कर्मचाऱ्यांना दिल्या जात आहेत. त्यामुळे नगरपालिकेचे कर्मचारीदेखील आता अधिक सतर्क आणि जबाबदारीने काम करताना दिसत आहेत.

सौ.दुर्गाताई तांबे यांनी गेली पंधरा वर्षे नगराध्यक्ष म्हणून संगमनेर शहराचे नेतृत्व केले आहे. त्यांच्या कार्यकाळात शहराच्या विकासाला एक दिशा मिळाली. स्वच्छता, पायाभूत सुविधा, नियोजनबद्ध विकास आणि नागरिकांशी थेट संवाद या बाबींना त्यांनी नेहमीच प्राधान्य दिले. आज त्याच परंपरेचा वारसा डॉ. मैथिलीताई तांबे समर्थपणे पुढे नेत असल्याचे चित्र दिसत आहे.

अलीकडेच सकाळच्या अशाच एका पाहणी दौऱ्याचा शेवट बसस्थानक परिसरातील आहेर कट्ट्यावर झाला. शहराच्या विविध भागांची पाहणी करून आलेल्या दुर्गाताई तांबे आणि डॉ. मैथिली तांबे यांनी येथे उपस्थित नागरिकांशी संवाद साधला. पायी चालून घामाने चिंब झालेल्या या दोघींची उपस्थितीच नागरिकांना वेगळा संदेश देणारी होती. यावेळी माजी नगराध्यक्ष विश्वास मुर्तडक, माजी नगरसेवक कैलास वाकचौरे यांच्यासह काँग्रेसचे कार्यकर्ते निखिल पापडेजा, सतीश आहेर आणि संतोष मुर्तडक उपस्थित होते. .

संगमनेरच्या विकासासाठी 'व्हिजन २.०'ची संकल्पना पुढे नेताना शहराच्या भविष्यातील गरजा लक्षात घेऊन नियोजन केले जात आहे. वाढती लोकसंख्या, वाहतुकीचे प्रश्न, पर्यावरण संवर्धन, स्वच्छता आणि आधुनिक नागरी सुविधा यांचा विचार करून पुढील वाटचाल सुरू आहे.

# चिमुकली खूनप्रकरणी नराधम दोषी

## २९ जूनला सुनावणार अंतिम शिक्षा

मुंबई (वृत्तसंस्था)

संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागून राहिलेल्या भोर तालुक्यातील नसरापूर चिमुकली अत्याचार आणि खून खटल्यात आज पुणे जिल्हा सत्र न्यायालयाने ६५ वर्षीय आरोपी भीमराव कांबळेला दोषी ठरवले आहे. न्यायालयात दोन्ही बाजूंचा अंतिम युक्तिवाद पूर्ण झाला असून, सरकारी वकिलांनी नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची जोरदार मागणी केली आहे. न्यायालयाने हा गुन्हा 'अत्यंत दुर्मिळ आणि अमानवी' असल्याचे मान्य केले आहे. मात्र नराधम भीमराव कांबळेला नेमकी कोणती शिक्षा दिली जाणार, याचा अंतिम फैसला आता सोमवार, २९ जून रोजी सुनावला जाणार आहे. त्यामुळे या क्रूरकर्म्याला फाशी मिळणार की जन्मठेप, यासाठी संपूर्ण महाराष्ट्राला आता २९ जूनची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

नसरापूर चिमुकली अत्याचार आणि खून खटल्यात आरोपीच्या शिक्षेवर कोर्टात अंतिम युक्तिवाद सुरू असताना विशेष न्यायालयाने अत्यंत कडक निरीक्षण नोंदवले आहे. हा गुन्हा अत्यंत दुर्मिळ, घृणास्पद आणि अमानवी आहे अशा शब्दांत न्यायालयाने या कृत्याचा तीव्र निषेध केला. तर दुसरीकडे, सरकारी वकिलांनी नराधम भीमराव कांबळेच्या क्रूरतेचा पाढा वाचत, समाजात असा दाखला बसावा यासाठी त्याला केवळ आणि केवळ



आरोपी भीमराव कांबळेला

'मृत्युदंडाची' (फाशीची) शिक्षा देण्याची आक्रमक मागणी केली आहे. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद संपला असून कोर्ट थोड्याच वेळात अंतिम शिक्षेची घोषणा करणार आहे.भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या निष्पाप चिमुरडीवर झालेल्या अमानुष अत्याचार आणि खून खटल्यात आज पुणे जिल्हा सत्र न्यायालयात अत्यंत नाट्यमय घडामोडी पाहायला मिळाल्या. विशेष न्यायाधीश एस. आर. साळुंखे यांनी ६५ वर्षीय नराधम आरोपी भीमराव प्रभाकर कांबळेला दोषी ठरवले आहे. गुन्हा सिद्ध झाल्यानंतर न्यायाधीशांनी आरोपीला थेट पिंजऱ्यात उभे करून, तू तो प्रसंग आठव आणि तूच सांग तुला कोणती शिक्षा द्यायला पाहिजे? असा थेट सवाल केला. त्यावर या निर्लज्ज नराधमाने कोर्टातही स्वतःचा बचाव करत अपघाताचा खोटा बनाव रचण्याचा प्रयत्न केला.

# अंधश्रद्धा निर्मूलनासाठी ज्येष्ठ नागरिकांनी पुढाकार घ्यावा : किसन भाऊ हासे



पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा नागरी सन्मान

संगमनेर : संगमनेर तालुका ज्येष्ठ नागरीक महासंघाच्यावतीने शनिवार दि. २० जून २०२६ रोजी नेहरू उद्यानातील विरंगुळा केंद्रात मासिक बैठकीत प्रबोधनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे यांच्या अंधश्रद्धा निर्मुलन विषयी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. संगमनेरचे भूषण ज्येष्ठ तमाशा कलावंत पद्मश्री रघुवीर खेडकर यांचा याप्रसंगी नागरी सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रपती पारितोषिक विजेते व ज्येष्ठ नागरिक महासंघाचे अध्यक्ष सो. ता. कळसकर गुरुजी होते. यावेळी ज्येष्ठ नागरिक महासंघाचे सदस्य व विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

व्याख्यानात किसन भाऊ हासे यांनी महाराष्ट्रातील अंधश्रद्धेमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या, भोंदू बाबांचे वाढते प्रस्थ तसेच त्यातून होणारे सामाजिक नुकसान यावर परखड भाष्य केले. अंधश्रद्धेविरोधात आवाज उठविणाऱ्या पत्रकार व सामाजिक कार्यकर्त्यांना येणाऱ्या अडचणींचाही त्यांनी उल्लेख केला. समाजातील सुजाण नागरिकांनी, विशेषतः ज्येष्ठ नागरिकांनी अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सक्रिय सहभाग घेऊन समाजप्रबोधनाची जबाबदारी पार पाडावी, असे आवाहन त्यांनी केले. वडगावपान येथील भोंदू राजेंद्र गडगे या विषयी माहिती प्रथम दैनिक युवावार्तानि प्रसिद्ध केली व त्यामुळे भोंदू गडगेवर कायदेशीर कारवाई होऊन तुरूंगवास झाला. या कार्याबद्दल किसन भाऊ हासे व सुशीला किसन हासे यांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पद्मश्री रघुवीर खेडकर यांनी आपल्या तमाशा क्षेत्रातील प्रदीर्घ प्रवासाच्या आठवणींना उजाळा दिला. पद्मश्री पुरस्कार स्वीकारतानाचा राष्ट्रपती भवनातील अनुभव तसेच राष्ट्रपती व पंतप्रधानांच्या भेटीचा प्रसंग त्यांनी भावनिक शब्दांत मांडला. त्या क्षणी आपल्याला संगमनेरकर व आईची आठवण झाल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमास सुरेश परदेशी, डी. बी. राठी, के. एस. देव्हारे सर देविदास बेल्हेकर, सुरेशराव कडलग, प्रा. मेमाणे, प्रा. गांधी. यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सामाजिक प्रबोधन व ज्येष्ठ नागरिकांच्या सहभागाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

# रोजगार व उद्योगनिर्मिती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन

युवावार्ता (प्रतिनिधी)- संगमनेर शहर व तालुक्यातील सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने शुक्रवार, दि. २६ जून रोजी सायंकाळी ४ वाजता दैनिक युवावार्ता कार्यालय, संगमनेर येथे ऑनलाईन रोजगार व उद्योगनिर्मिती मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये विविध शासकीय योजनांअंतर्गत उद्योग उभारणी, व्यवसाय सुरू करण्यासाठी उपलब्ध आर्थिक सहाय्य, कर्ज योजना तसेच रोजगाराभिमुख प्रशिक्षण याविषयी तज्ज्ञ व्यक्तींकडून सविस्तर मार्गदर्शन केले जाणार आहे. याशिवाय रोजगाराच्या संधी शोधणाऱ्या तसेच उद्योग सुरू करण्याची इच्छा असलेल्या गरजू व्यक्तींची प्रशिक्षणासाठी नावनोंदणी देखील करण्यात येणार आहे. 'आपले सरकार सेवा केंद्र' योजनेची माहितीही या शिबिरात देण्यात येणार असून, इच्छुक उमेदवारांना ऑनलाईन प्रस्ताव दाखल करण्याबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे. बेरोजगार युवक-युवती, उद्योजक बनण्याची इच्छा असलेले नागरिक तसेच रोजगाराच्या शोधात असलेल्या इच्छुकांनी या मार्गदर्शन शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# अपप्रचाराच्या धुरळ्यातही रायगडासाठी झटणारे छत्रपती संभाजीराजे





महाराष्ट्राच्या अस्मितेचे प्रतीक असलेल्या रायगडाशी आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांशी भावनिक नाळ जोडलेला प्रत्येक शिवभक्त ६ जून या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो. कारण हा दिवस केवळ राज्याभिषेकाचा नसून स्वराज्याच्या गौरवाचा, शिवविचारांच्या जागराचा आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या कार्याला अभिवादन करण्याचा दिवस आहे. अखिल भारतीय शिवराज्याभिषेक समितीच्या माध्यमातून गेल्या अनेक वर्षांपासून हा सोहळा भव्य स्वरूपात साजरा होत आहे. छत्रपती संभाजीराजे आणि युवराणी संयोगिताराजे यांच्या मार्गदर्शनाखाली या सोहळ्याने राष्ट्रीय स्वरूप प्राप्त केले असून लाखो शिवभक्तांसाठी तो श्रद्धा, संस्कार आणि स्वाभिमानाचा सोहळा बनला आहे.

मात्र, गेल्या काही काळापासून सोशल मीडियाच्या माध्यमातून छत्रपती संभाजीराजे यांच्याविषयी जाणीवपूर्वक अपप्रचार करण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. एखाद्या व्यक्तीची भूमिका, विचार किंवा राजकीय निर्णय यावर मतभेद असू शकतात; परंतु ज्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाचा मोठा कालखंड इतिहास, गडसंवर्धन आणि समाजप्रबोधनासाठी खर्च केला, अशा व्यक्तिमत्त्वाचे मूल्यमापन केवळ अफवा, अर्धसत्य आणि सोशल मीडियावरील मोहिमांच्या आधारे करणे, हे महाराष्ट्राच्या वैचारिक परंपरेला शोभणारे नाही.

छत्रपती संभाजीराजे यांना जवळून पाहण्याचा योग आलेल्या अनेक कार्यकर्त्यांप्रमाणेच माझाही त्यांच्याशी थेट संबंध आलेला आहे. स्वराज्य संघटनेत जिल्हाप्रमुख म्हणून काम करताना छत्रपती संभाजीराजे यांचे सुसंस्कृत समाजकारण, संयमी राजकारण आणि सर्वसमावेशक नेतृत्व जवळून अनुभवले आहे. त्यामुळे हा लेख कोणत्याही राजकीय स्वार्थातून किंवा पदाच्या अपेक्षेतून लिहिला गेलेला नाही. आज मी संघटनात्मकदृष्ट्या सक्रिय नसलो, तरी विषय जेव्हा छत्रपती घराण्याचा आणि छत्रपती संभाजीराजे यांच्या जाणीवपूर्वक बदनामीचा येतो, तेव्हा एक मावळा म्हणून सत्य मांडण्याची जबाबदारी पार पाडणे आवश्यक वाटते.

छत्रपती घराण्याचा वारसा हा केवळ रक्ताचा नसतो, तो संस्कारांचा असतो. हा वारसा मिरविण्यापेक्षा तो जपण्याचे आणि पुढे नेण्याचे कार्य अधिक कठीण असते. छत्रपती संभाजीराजे यांनी याच मार्गाचा स्वीकार केला. लोकप्रियतेचा सोपा मार्ग निवडण्याऐवजी त्यांनी इतिहास, संस्कृती आणि समाजकारणाचा मार्ग निवडला. गड-किल्ल्यांचे संवर्धन, शिवराज्याभिषेक सोहळ्याला जागतिक ओळख, युवकांमध्ये इतिहासाविषयी





अभिमान निर्माण करणे आणि सामाजिक प्रश्नांवर अभ्यासपूर्ण भूमिका घेणे, या माध्यमातून त्यांनी आपले वेगळेपण सिद्ध केले. रायगड हा केवळ दगड-मातीचा गड नाही. तो महाराष्ट्राच्या आत्म्याचा भाग आहे. शिवरायांच्या राज्याभिषेकाचा आणि त्यांच्या अखेरच्या वास्तव्याचा साक्षीदार असलेल्या या गडाच्या संवर्धनासाठी छत्रपती संभाजीराजे यांनी सातत्याने प्रयत्न केले. रायगड प्राधिकरणाच्या माध्यमातून गडाला नवसंजीवनी देण्याचा प्रयत्न झाला. शिवभक्तांसाठी सुविधा, ऐतिहासिक वास्तूंचे जतन, परिसर विकास, स्वच्छता आणि संवर्धनाच्या विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला.

स्वराज्य संघटनेत काम करत असताना एक गोष्ट प्रकर्षाने अनुभवली ती म्हणजे छत्रपती संभाजीराजे यांच्या नेतृत्वातील सुसंस्कृतपणा. राजकारणात कटुता असली, विरोधक असले, मतभेद असले तरी व्यक्तीविषयी द्वेष बाळगण्याची वृत्ती त्यांच्या स्वभावात कधी दिसली नाही.

असंख्य विस्थापित कार्यकर्ते, समाजातील विविध क्षेत्रांतील नेतृत्व आणि दुर्लक्षित घटकांना त्यांनी संधी दिली. अनेकांना राजकीय आणि सामाजिक मुख्य प्रवाहात आणण्याचे काम त्यांनी केले. स्वतःच्या भोवती व्यक्तिपूजेचा गोतावळा निर्माण करण्यापेक्षा नवे नेतृत्व उभे राहावे, ही त्यांची भूमिका राहिली. आज सोशल मीडियाच्या युगात वास्तवापेक्षा आभासी प्रतिमा अधिक प्रभावी बनत चालली आहे. काही मंडळी राजकीय पूर्वग्रहातून किंवा प्रसिद्धीच्या हव्यासापोटी छत्रपती संभाजीराजे यांच्या विरोधात अपप्रचार करत आहेत. मात्र, इतिहासाच्या अभ्यासाऐवजी व्हायरल पोस्टच्या आधारे मत तयार करणाऱ्यांनी एकदा रायगडाच्या संवर्धनासाठी झालेल्या प्रयत्नांचा, शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या उभारणीचा आणि समाजप्रबोधनाच्या कार्याचा वस्तुनिष्ठ आढावा घेण्याची गरज आहे.

राजकीय भूमिका बदलू शकतात. संघटना बदलू शकतात. माणसे वेगवेगळ्या वाटांनी जाऊ शकतात, स्वतः आज स्वराज्य संघटनेत सक्रिय नाही. परंतु संघटना आणि विचार यामध्ये फरक असतो. व्यक्ती आणि वारसा यामध्ये फरक असतो. छत्रपती घराण्याचा विषय हा कोणत्याही एका पक्षाचा किंवा संघटनेचा विषय नाही. तो संपूर्ण महाराष्ट्राच्या अस्मितेचा विषय आहे. त्यामुळे जेव्हा जाणीवपूर्वक बदनामीचे राजकारण केले जाते, तेव्हा शांत बसणे म्हणजे इतिहासाशी बेईमानी करण्यासारखे आहे.

छत्रपती संभाजीराजे यांच्याशी सहमत असणे किंवा नसणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे. त्यांच्या राजकीय निर्णयांवर टीका होऊ शकते. लोकशाहीमध्ये मतभेद स्वाभाविक आहेत. पण मतभेद आणि द्वेषपूर्ण अपप्रचार यामध्ये मोठा फरक आहे. व्यक्तीच्या दशकभराच्या कार्याला नाकारून काही क्षणांच्या व्हिडिओ आणि पोस्टच्या आधारावर इतिहास लिहिता येत नाही.

आज काही जण स्वतःला शिवप्रेमी म्हणवून घेतात, परंतु शिवरायांनी शिकविलेल्या विवेक, संयम आणि कर्तृत्वाच्या मूल्यांकडे दुर्लक्ष करतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी व्यक्तीपेक्षा कार्याला महत्त्व दिले. त्यामुळेच छत्रपती संभाजीराजे यांचे मूल्यमापनही त्यांच्या कार्याच्या आधारेच व्हायला हवे. कारण इतिहास सोशल मीडियावर लिहिला जात नाही; तो त्याग, समर्पण आणि कृतीच्या शाईने लिहिला जातो.

मी जवळून अनुभवलेले छत्रपती संभाजीराजे यांचा स्वभाव हा सुसंस्कृत, अभ्यासू आणि समाजहिताचा विचार करणारा आहे. राजकारणात सौजन्य जपणारे नेतृत्व आज दुर्मिळ होत असताना, संवाद आणि संयम यांना महत्त्व देणारे व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांनी स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. त्यामुळे त्यांच्याविषयी जाणीवपूर्वक पसरविल्या जाणाऱ्या गैरसमजांना उत्तर देणे, ही केवळ राजकीय भूमिका नसून एक मावळा म्हणून पार पाडलेली नैतिक जबाबदारी आहे.

रायगडाशी असलेली नाळ, शिवविचारांप्रती असलेली बांधिलकी आणि समाजातील नव्या नेतृत्वाला दिलेले बळ, यामुळे छत्रपती संभाजीराजे यांचे कार्य निश्चितच वेगळे ठरते. काळाच्या ओघात राजकारण बदलेल, चेहरे बदलतील, समीकरणे बदलतील; पण रायगडासाठी झटणाऱ्यांची नोंद इतिहास कायम ठेवेल. अपप्रचाराचे धुरळे उडतील, आरोप होतील, टीका होईल; परंतु सत्याला काळाची साथ असते. कारण वारसा हा केवळ सांगण्याची गोष्ट नसते, तो जगण्याची जबाबदारी असते. आणि ही जबाबदारी छत्रपती संभाजीराजे यांनी प्रामाणिकपणे पार पाडली आहे, असे ठामपणे सांगण्याचे धाडस करतो. आज मी कोणत्याही राजकिय पदावर नाही, कोणत्याही अपेक्षेने लिहित नाही. पण एक छत्रपतीचा मावळा म्हणून, स्वराज्याच्या विचारांवर प्रेम करणारा कार्यकर्ता म्हणून आणि छत्रपती संभाजीराजे यांचे सुसंस्कृत समाजकारण जवळून पाहिलेला साक्षीदार म्हणून एवढेच म्हणावेसे वाटते- अपप्रचाराचा धुरळा काही काळ दृष्टी धूसर करू शकतो, परंतु रायगडासाठी झटणाऱ्या हातांचा आणि शिवविचारांसाठी वाहिलेल्या आयुष्याचा प्रकाश इतिहासाच्या पानांवर कायम तेजस्वी राहणार आहे.

**- शब्दांकन :**

**इंजि. आशिष तानाजी कानवडे**

**स्वराज्य संघटनेचे माजी जिल्हाप्रमुख, एक शिवभक्त**

ताम्हाणे हॉस्पिटल
पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जडा डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५० संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



भंडारी
विवाह
"शुभकार्यासाठी शुभवस्त्रखरेदी"
शेरवाणी । कुर्तापायजमा । ब्लेजर । जोधपुरी
पैठणी । घागरा । शालु । कांजीवरम । प्युअरसिल्क । डिजायनर सारीज्
मेनरोड कॉर्नर, संगमनेर

# दिवटे सुपरमार्केटचा शुक्रवारी भव्य शुभारंभ

## ग्राहकांसाठी आकर्षक ऑफर्सची मेजवानी

युवावार्ता (प्रतिनिधी) संगमनेर

संगमनेर तालुक्यातील नागरिकांच्या दैनंदिन गरजा एकाच छताखाली पूर्ण करण्याच्या उद्देशाने दिवटे सुपरमार्केटचा भव्य शुभारंभ शुक्रवार, दि. २६ जून २०२६ रोजी सकाळी १० वाजता होणार आहे. पूना-नाशिक महामार्गावरील गुंजाळवाडी येथे १३२ के.व्ही. सबस्टेशनसमोर मान्यवर संगमनेरकरांच्या हस्ते या सर्वगुणसंपन्न सुपरमार्केटचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या उद्घाटन सोहळ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगरसेवक सोमेश्वर दिवटे, सौ. प्रियंका दिवटे व दिवटे परिवाराने केले आहे.

दिवटे सुपरमार्केटमध्ये किराणा, दैनंदिन वापराच्या वस्तू तसेच घरगुती गरजेच्या विविध वस्तू ग्राहकांना एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहेत. शुभारंभानिमित्त ग्राहकांसाठी २६ जून ते १२ जुलै २०२६ या कालावधीत विशेष ऑफर्स जाहीर करण्यात आल्या आहेत. ३३०० रुपयांच्या खरेदीवर दररोज ४ किलो साखर मोफत देण्यात येणार असून ही ऑफर तेल, तूप, साखर आणि ठोक सामान वगळून इतर वस्तूंवर लागू राहणार आहे. तसेच सर्व प्रकारच्या बिस्किटे, बाथसोप, डिशवॉश बार आणि डिटर्जंट बारवर १० टक्के सूट देण्यात येणार आहे. याशिवाय ११०० व २२०० रुपयांच्या खरेदीवर आकर्षक भेटवस्तूंचीही योजना ठेवण्यात आली आहे. ग्राहकांच्या सुविधेसाठी मोफत घरपोच किराणा सेवा उपलब्ध करून देण्यात आली असून अधिक माहितीसाठी ९५२७९४१९४२ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन दिवटे परिवाराने केले आहे. स्मार्ट खरेदीची स्मार्ट ऑफर या संकल्पनेतून ग्राहकांना दर्जेदार वस्तू व आकर्षक सवलतींचा लाभ मिळणार असल्याने संगमनेरकरांमध्ये या नव्या सुपरमार्केटबाबत उत्सुकता निर्माण झाली आहे.

दिवटे सुपरमार्केट
भव्य शुभारंभ ऑफर
26 जून ते 12 जुलै 2026 पर्यंत
शुक्रवार दि. 26 जून 2026 रोजी
स. 10.00 वाजता
आजच खरेदी करा..!
95-27-941-942
132 kv सब स्टेशन समोर, पूना-नाशिक हायवे, गुंजाळ वाडी संगमनेर
3300/- रु. च्या खरेदीवर
सर्व ऑफर तेल तूप साखर व ठोक सामान वगळून
स्मार्ट खरेदीची स्मार्ट ऑफर..!
4 Kg दररोज मोफत साखर
सर्व बिस्किट 10% OFF
सर्व बाथसोप 10% OFF
1100/- रु. च्या खरेदीवर FREE
2200/- रु. च्या खरेदीवर FREE
सर्व डिशवॉश बार 10% OFF
सर्व डिटर्जंट बार 10% OFF
5% OFF नामांकित वस्तूंवर
मोफत घरपोच किराणा
BUY 1 GET 1 FREE काही प्रॉडक्टवर
विकेंड ऑफर प्रत्येक आठवड्यात

# दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे नाशिक रोड शोरूम नव्या रूपात ग्राहकांच्या सेवेत



दंडे गोल्ड अँड डायमंड्स, नाशिक रोड शोरूमच्या नूतनीकरणानंतरच्या उद्घाटनप्रसंगी जनरल मॅनेजर याकुब शेख व पर्चेस मॅनेजर अनिल कुमट यांच्या समवेत संचालक अनिल गोविंद दंडे, सौ. सुप्रिया अनिल दंडे, योगेश्वर धनंजय दंडे, मीना धनंजय दंडे आदी.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - नाशिक रोड येथील सुविख्यात दंडे गोल्ड अँड डायमंड्स यांनी आपल्या शताब्दी वर्षात पदार्पणाच्या निमित्ताने नाशिक रोड येथील शोरूमचे नूतनीकरण पूर्ण करून ते नव्या रूपात ग्राहकांच्या सेवेत दाखल केले आहे.

दिनांक २४ जून २०२६ रोजी नूतनीकरण पूर्ण झालेल्या शोरूमचा उद्घाटन सोहळा उत्साहात पार पडला. पेढीचे जनरल मॅनेजर याकुब शेख सहपरिवार व पर्चेस मॅनेजर अनिल कुमट सहपरिवार यांच्या हस्ते उद्घाचन करण्यात आले. यावेळी दंडे परिवार, कर्मचारीवर्ग, ग्राहक आणि मान्यवर उपस्थित होते.

१९२७ पासून विश्वास, गुणवत्ता आणि उत्कृष्ट सेवेची परंपरा जपणाऱ्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सने काळानुरूप बदल स्वीकारत आपल्या ग्राहकांसाठी नेहमीच नाविन्यपूर्ण उपक्रम राबवले आहेत. त्याच परंपरेचा भाग म्हणून नाशिक रोड येथील शोरूमचे संपूर्ण नूतनीकरण करण्यात आले असून, त्याला आधुनिक आणि आकर्षक स्वरूप देण्यात आले आहे.

नूतनीकरणानंतर शोरूममध्ये अत्याधुनिक लाईटिंग, आकर्षक डिस्प्ले व्यवस्था, आरामदायी ग्राहक बैठक व्यवस्था, प्रशस्त दालन तसेच सुबक इंटिरिअरची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे ग्राहकांना दागिन्यांची खरेदी करताना अधिक सुखद, आरामदायी आणि संस्मरणीय अनुभव मिळणार आहे. सोने, चांदी आणि हिऱ्यांच्या आकर्षक व विस्तृत दागिन्यांच्या कलेक्शनसह ग्राहकांना आता अधिक आधुनिक वातावरणात खरेदीचा अनुभव घेता येणार आहे. शोरूममधील नवीन मांडणी आणि आकर्षक सादरीकरणामुळे प्रत्येक दागिन्याचे सौंदर्य अधिक खुलून दिसणार आहे.

ग्राहकांच्या बदलत्या आवडीनिवडी लक्षात घेऊन शोरूममध्ये -रर्पींळ ९२.५ डळर्श्रींशी या प्रीमियम सिल्व्हर ज्वेलरी ब्रँडसाठी स्वतंत्र काउंटर तसेच चरसळपर १४घढ त्रेश्चव ठशरश्र उळरोपव गशुशश्रश्रशी या आधुनिक आणि आकर्षक दागिन्यांच्या संग्रहासाठी स्वतंत्र काउंटरची व्यवस्था करण्यात आली आहे.

याबाबत दंडे गोल्ड अँड डायमंड्सचे संचालक श्री. अनिल गोविंद दंडे व श्री. योगेश्वर धनंजय दंडे यांनी सांगितले की, शतकभर आमच्यावर विश्वास ठेवणाऱ्या ग्राहकांसाठी अधिक उत्कृष्ट आणि आधुनिक खरेदी अनुभव निर्माण करण्याच्या उद्देशाने हे नूतनीकरण करण्यात आले आहे. परंपरेचा वारसा जपत आधुनिकतेची जोड देण्याचा आमचा सातत्यपूर्ण प्रयत्न राहिला आहे. ग्राहकांना सर्वोत्तम सेवा, उत्कृष्ट दागिने आणि दर्जेदार खरेदी अनुभव देणे हेच आमचे ध्येय आहे. नाशिक रोड, सिन्नर आणि संगमनेर येथे कार्यरत असलेल्या दंडे गोल्ड अँड डायमंड्सने १,४५,००० हून अधिक ग्राहकांचा विश्वास संपादन केला आहे. नाशिक येथील कॉर्पोरेट कार्यालयासह कार्यरत असलेला हा ब्रँड १७० हून अधिक कर्मचाऱ्यांच्या समर्पित सेवेमुळे महाराष्ट्रातील अग्रगण्य ज्वेलरी ब्रँड म्हणून आपली वेगळी ओळख निर्माण करण्यात यशस्वी ठरला आहे.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटिव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
30% ते 70% डिस्काउंट
शालू । कांजीवरम । सिल्क पैठणी । बनारसी
संपर्क : 8390005001
जाणता राजा मार्ग, आय.डी.बी.आय बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहितांच्या, नवविवाहितांच्या, चाळीशीनंतरच्या स्त्री-पुरूषांच्या तसेच मधुमेही व व्यसनाधिनांच्या
सेक्स समस्या
हस्तमैथुनाचे दुष्परिणाम/स्वप्नदोष/धातुपात
शीघ्रपतन/असमाधान/कमजोरी/ शुक्राणुंची कमी
गुप्तरोग/ त्वचारोग/ नपुंसकत्व/ मानसिक नैराश्य
जर्मनमेड होमिओपॅथिक औषधे-शास्त्रोक्त मार्गदर्शन
डॉ. अभय मुथा (मनोलैंगिक विकार तज्ञ)
B.H.M.S., M.D.(A.M), M.D.(Acu)., P.G.(SEXOLOGY)
३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव (राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त)
अत्याधुनिक मशिनच्या सहाय्याने तपासणी करून औषधोपचार
(प्रत्येक नवीन रूग्णासाठी १ तास वेळ दिला जातो) ऑपॉईंटमेंट आवश्यक
१ लाखांहून अधिक रूग्णांवर यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
सेक्स सुपर स्पेशालिटी होमिओपॅथिक क्लिनिक
विनायकनगर, नगर-पुणे रोड, अहिल्यानगर
www.sextreatment.in
94 22 23 90 13

कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25